सारा आकाश / नायिका / मधु

छान कलाकृती
कोणती ?
जी पाहताना
आपल्याला
ही घरी
घेऊन जावी
असे आसुसून
वाटते ती !



# माणूस

शनिवार
१९ सप्टेंबर १९७०
चाळीस पैसे

शनिवार, १९ सप्टेंबर १९७०

# माणूस

वर्ष : दहावे
अंक : एकोणीसावा

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

किमत
चाळीस पैसे

वार्षिक वर्गणी
तीस रुपये

परदेशाची वर्गणी
साठ रुपये

## सप्रेम नमस्कार...

◻ 'माणूस'मध्ये अलीकडेच प्रसिद्ध झालेला 'ठेवी का घटल्या' हा लेख व त्यावर वाचकांच्या पत्रव्यवहारात प्रसिद्ध झालेली साधकबाधक चर्चाही वाचली. परंतु मला एक शंका अनेक दिवसापासून वाटत आहे तिचा मात्र मूळ लेख व त्यावरील टीकेत काहीच उहापोह वाचावयास न मिळाल्यामुळे हे पत्र आपणास लिहीत आहे.

माझी शंका अशी आहे की ठेवी वाढविण्यासाठी व्याजाच्या दरात वाढ का करीत नाहीत? मागे एकदा जर्मनीमध्ये श्री. लुडविग एरहार्ड यांनी लहान बचती आकृष्ट करण्यासाठी बचतीवर ८ टक्के किंवा असेच काहीतरी व्याज द्यावयास सुरुवात करून लहान बचतीत आश्चर्यकारक वाढ साधली असे वाचल्याचे स्मरते. आपल्याकडे अशी काही उपाययोजना का केली जात नाही याचे मला नेहमी नवल वाटत आले आहे. आमच्याकडे लहान बचतीवर (स्मॉल सेव्हिंग्ज्) बचत खात्यातील रकमेला अवघे ३½ टक्के व्याज दिले जाते तर मुदतीच्या ठेवींवर वर्षासाठी ५½ टक्के आणि पुढे मुदत असेल त्यानुसार ½ टक्का वाढ व्याजात दिली जाते. हे व्याजाचे दर म्हणजे गरीब व मध्यमवर्गाची थट्टाच होय असे कित्येकदा वाटते. तर अशी काही उपाययोजना आपल्याकडे का करीत नाहीत, त्यात अर्थशास्त्रदृष्ट्या काही अडचणी आहेत काय व असल्यास त्या कोणत्या याचा तज्ज्ञांकरवी खुलासा झाल्यास बरे होईल.

१० सप्टेंबर, १९७० — ग. वि. पेठे, मुंबई

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक




अरुण गोखावी

# मुंबई खरी आमचीच !

परवा मुंबईचे एक गाढे विद्वान, व्यासंगी टीकाकार ' मुंबई वार्ता ' वाचून अपरंपार तुच्छतेने उद्गारते झाले – ' गाढवा ! मुंबई काय झोपडपट्टीवाल्यांची आहे होय ? खरी मुंबई म्हणजे मध्यमवर्गाची. मध्यमवर्ग हा मुंबईचा कणा. झोपडपट्टी· वाले असतील बारा पंधरा लाख. म्हणून काय त्यांची मुंबई ही खरी मुंबई ? तिच्या काही अक्कल ? –

या विद्वान, व्यासंगी चष्मिष्ट टीकाकारासमोर मी पामर काय तोंड उघडणार ! बैलासारखी मान हलवून चूक कबूल केली. अपराधाबद्दल माफी मागितली आणि पुन्हा अशी चूक कधीच करणार नाही अशी ग्वाही दिल्यावर ते मध्यमवर्गी टीकाकार संतुष्ट झाले. आनंद वर्तमान होत्साते उपदेशले, ' वत्सा ! मध्यमवर्गावर लिही. खरी मुंबई मध्यमवर्गाची. बाकी सारे झूट !'

अखिल ब्रह्मांडाचे पितृत्व स्वतःकडे घेणाऱ्या मध्यमवर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या त्या विद्वान, व्यासंगी मुंबईकर टोकाकारांनी येणेप्रमाणे कानउघाडणी करताच अंतर्मुख झालो. विचार करू लागलो. त्या विद्वान टीकाकारांना कोणता मध्यमवर्ग अभिप्रेत होता ? उच्च-मध्यमवर्ग, मध्यम-मध्यमवर्ग की कनिष्ठ मध्यमवर्ग ? की हौसिंग बोर्डाने बांधलेल्या एम्. आय्. जी. (Middle Income Group) इमारतीत राहणारा मध्यमवर्ग ? कोणता मध्यमवर्ग ? परळ किंवा गिरगावात एका खोलीत संसार करणारा कारकून स्वतःला मध्यमवर्गीय समजतो आणि शिवाजी-पार्कला किंवा पेडररोडला मोठा फ्लॅट बाळगून दोन गाड्या उडविणारादेखील आपण मध्यमवर्गीय असे म्हणतो. गिरणीत मजुरी करणारा ब्राह्मण कामगार झोपडपट्टीत राहत असला तरी मध्यमवर्गीयांच्या ताठ्यात राहतो. महिन्याला हजारो रुपये कमविणारे वकील, डॉक्टर्स, छोटे कारखानदारही स्वतःला मध्यमवर्गीय समजतात. मग मुंबईचा असा कोणता मध्यमवर्ग या विद्वान टीकाकारांना अभिप्रेत होता ?

खरी मुंबई, खरी मुंबई कोणती ? त्या विद्वान-व्यासंगी टीकाकारांचे ठासून म्हणणे हे की खरी मुंबई मध्यमवर्गाची. आता अंतर्मुखतेची कितीही गाढ खोली गाठली, खूप विचार केला तरी त्या विद्वान टीकाकारांचे म्हणणे पटण्याइतपत योग्यता आपल्यात येऊ शकत नाही. मुंबईत कितीही हिंडले तरी मुंबई दिसते

झोपडपट्टीवाल्यांची, केरकचऱ्याची, भिकाऱ्यांची, मळके, फाटके कपडे घालणाऱ्यांची किंवा अर्ध-नागडे राहणाऱ्यांची-नाही तर एकदम बंगलेवाल्यांची, मोटारवाल्यांची. निरुपद्रवी मध्यमवर्ग दिसतो, नाही असे नाही. पण मुंबई डोळ्यावर येते ती एकदम झोपडीवाल्यांची आणि बंगलेवाल्यांची.

पण मग ते विद्वान गृहस्थ असे कसे चुकीचे बोलतील ? मुंबईत संख्येने मध्यमवर्गीय बहुमतात आहेत असे त्यांना म्हणायचे होते काय ? असतीलही. पण मध्यमवर्गाची व्याख्या कुणी करायची ? कारण मध्यमवर्गीय झोपडपट्टीतही राहतात. रुपये दीडशेपासून दोन हजारापर्यंत मिळविणारे मध्यमवर्गीय म्हणायचे ? कोण मध्यमवर्गीय ? घरी फ्रीज ठेवणारे की फॅन ठेवणारे की रेडियो] ठेवणारे ? पण आपल्याला खरी मुंबई – खरी मुंबई म्हणायचे होते ते त्या मुंबईला की जी एकदम डोळ्यांना झोंबते, छातीला भिडते, काळजाला कापते ती. मग हे विद्वान टीकाकार असे का सांगतात की मध्यमवर्ग हीच ती खरी मुंबई !

अरेच्चा ! असेही असेल ! एवढा वेळ अंतर्मुखतेत घालविल्यावर हळूहळू या दगडी डोक्यात आता थोडा मध्यमवर्गीय; प्रकाश शिरू लागला आहे. ते गाढे विद्वान, महान व्यासंगी, चव्हिष्ट टीकाकार म्हणतात त्याला काहीतरी खूप खोल असा अर्थ असला पाहिजे. मुंबई मध्यमवर्गाचीच असा चष्मा घालून आपण मुंबईकडे पाहावे असा तर त्या महान पंडिताचा आशय नाही ना ? तसेच असेल. त्याशिवाय दुसरे काही असणे शक्यच नाही. खरेच केवढी सोपी गोष्ट आहे. पण आपल्याला उमगायला एवढा वेळ अं. नाहीतरी आपला मेंदू या झोपडपट्ट्यांविषयीच्या आणि बंगलेवाल्यांविषयीच्या पार्शालिटीमुळे निकृष्ट झालाच आहे. त्यामध्ये एवढ्या तडफदार सुबुद्ध मध्यमवर्गीय कल्पना शिरायला थोडा अवधी लागणारच.

असो. तर त्या गाढ्या-विद्वान, महान-व्यासंगी मध्यमवर्गीय तत्त्ववेत्याच्या म्हणण्याप्रमाणे आपण हा चष्मा घालायचा आणि घराबाहेर पडायचे. आणि काय आश्चर्य ! एकदम मुंबईचा कायापालट. कारण या चष्म्यातून आजूबाजूच्या झोपडपट्ट्या दिसतच नाहीत. हातभट्टीची झोकून रस्त्याच्या कडेला पडलेले मर्द दिसतच नाहीत. अख्ख्या मुंबईतील घाण दिसतच नाही. नको ते वास घ्राणेंद्रियावर आक्रमण करतच नाहीत. आपल्याला कधीही न मिळणारे बंगले मोटारी मात्र दिसतात. पण त्यात खंत करण्याचे कारण नाही.






कारण आपल्याकडे बुद्धीचा मक्ता आहे ना. त्या क्षुद्र 'मोटर-बगले-वाल्यांपेक्षा आपण निश्चितच श्रेष्ठ, कारण आपण बुद्धवाले. झोपडी-वाले तर आपल्या खिजगणतीतही नाहीत (कारण ते आपल्या चष्म्या-तून दिसतच नाहीत.)

हा चष्मा घालून बाहेर पडले की मुंबई म्हणजे स्वर्ग. कारण सारेच मध्यमवर्गीय. आपण म्हणा-यचे, 'अरे चल रे लवकर. नऊ तेराला आता फक्त चारच मिनिटं उरली आहेत. घुसता आलं पाहिजे.'

कुणी आपला मध्यमवर्गीय सखा म्हणणार, 'आयला, सांगायचंच राह्यलं. गेल्या सात वर्षात जमली नाही ती गोष्ट आम्ही काल केली मिष्टर –!'

'कुठली कुठली......वगैरे.'

'अरे ऐका – ऐका – सहा एकोणीसची कर्जत प्लॅटफॉर्मवर लागली न् असा डॅश मारून आत जंप घेतली की – अरे ऐकताय काय – एकदम खिडकीची जागा!'


'मायगॉड...' '...कमाल आहे अं...' 'आपल्याला कर्जतमध्ये आयुष्यात कधी खिडकी मिळाली नाही बुवा...' '—कॉंग्रॅट्स्...आता चहा हवा'... वगैरे किती गोड संवाद हा! अंगावर सुखाचे रोमांच उभे राहतात. हेच खरे त्या मध्यम-वर्गीय चष्म्याचे सुख.

अहाहा! मुंबईचा मध्यमवर्ग! किती चांगला समाज आहे हा. रोज नियमाने कारकुनी नाहीतर मास्तरकी करणारा. महिन्याच्या पगारातले पाच दहा रुपये भिशीत घालणारा, रोज न चुकता घरी झोपणारा, जात पात सण पाळणारा. कथा, कादंबऱ्या, कविता वाचणारा – लिहिणारा. आपला चष्मा न काढता झोपडपट्ट्यांवरील कल्पनारम्य कादंबऱ्या लिहिणारा – वाचणारा, राजकारणाची वांझ चर्चा करणारा.

हा चष्मा घालून लिहिलेल्या कथा – कादंबऱ्या आणि कविताही किती गोड, निष्पाप असतात बरं. चंदू दामलेचं विमा गाडगीळवरच प्रेम बसणार. सुशीला शिंदे या घाणेरड्या नावाच्या मुलीशी कुण्या चंदू दामलेचं सहजपणे प्रेम बसल्याचं दाख-विण्याची कुणाची छाती आहे! हे मध्यमवर्गीय साहित्य आहे. त्यात असले घाणे-रडे प्रकार चालायचे नाहीत. अर्थात लेखक जर मध्यमवर्गीय शिंदे असेल तर तोही

अशोक भोसलेचं प्रेम विमा देशपांडेवर बसविण्याचं धाडस दाखविणार नाही. या मध्यमवर्गीय साहित्याचे आणखी किती गुण सांगावे !

तेव्हा असले गोड साहित्य वाचीत, आपल्या गाढ्या विद्वान, महान व्यासंगी महापंडितांसारख्या टीकाकारांनी लिहिलेल्या टीकासाहित्याचे परिशीलन करीत, फास्ट लोकलमध्ये खिडकी मिळविण्याच्या पैजा मारीत आणि फक्त बॉसला घाबरीत मुंबईचा हा महान समाज जगत असतो. अशा या महान समाजाचा अपमान करण्याचा अपराध परवा घडला. त्याबद्दल आपल्या गाढ्या विद्वान टीकाकारांनी आपली हजेरीही घेतली हे बरे झाले.




या मध्यमवर्गीयांचा मुंबईवर पहिला क्लेम आणि आपण तो मान चक्क झोपडीवाल्यांना देऊन टाकला. या झोपड्या काढून टाकल्या पाहिजेत आणि त्या पंधरा सोळा लाख झोपडीवाल्यांना मुंबईबाहेर हांकून दिले पाहिजे म्हणजे मध्यमवर्गाचा क्लेम सिद्ध होईल. नाही तर निदान आमचे गाढे – विद्वान, महान व्यासंगी मध्यमवर्गीय टीकाकार यांनी शिफारस केलेले चष्मे तरी सर्वांना वाटले पाहिजेत. त्यांनी जर या चष्म्याचे पेटंट काढले तर बरे होईल.

## तशी ती यांचीही !

मुंबईतील झोपडपट्ट्या उठविण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सरकार हाती घेत आहे आणि त्याचा परिणाम म्हणूनच की काय ठिकठिकाणी नव्या झोपडपट्ट्या नव्या दमाने उठत आहेत. वांद्रा-सांताक्रूझ-माहीम भागात अशा नवीन झोपड्या आता वेगाने निर्माण होऊ लागल्या आहेत.

याचे कारण म्हणजे बाहेर फुटलेली एक सरकारी योजना. वांद्रा-सांताक्रूझ हायवेवरील झोपड्या हलविणे हे सरकारी यादीतील पहिले काम आहे. कारण तो बड्या पाहुण्यांचा जाण्यायेण्याचा रस्ता आहे. म्हणून त्या वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेवरील झोपडपट्ट्या हलवून त्या ऐवजी पक्की घरे बांधण्याची एक भव्य योजना

सरकारने हाती घेतल्याची बातमी आहे. या झोपड्यांमध्ये राहणाऱ्यांची प्रथम यादी करण्यात येईल. नंतर त्यांना तेथून हलविण्यात येईल आणि मग त्यांना हायवेच्या बाजूची पक्की घरे देण्यात येतील अशी ही कोटयावधी रुपयांची योजना आहे.

ही योजना कशी तरी बाहेर फुटली. म्हणजे काही इंटरेस्टेड राजकीय कार्यकर्त्यांनीच फोडली. आणि भराभरा नव्या झोपड्या हायवेवर उभ्या राहू लागल्या.

तुम्ही झोपड्या उभारा. आम्ही तुमचे नाव यादीत घालण्याची व्यवस्था करू. ७२ ची मतं मात्र आम्हाला द्या. अशी ही स्ट्रॅटेजी आहे. केंद्रीय मंत्री नामदार के. के. शाहा यांची ही योजना आहे म्हणे. ही योजना बाहेर पडू देऊ नका असा सल्ला मुख्यमंत्री नाईक यांनी दिला होता. पण योजना फुटलीच. श्री. शाह यांना ७२ च्या निवडणुकीत लोकसभेसाठी येथून उभे राहायचे आहे अशी वदंता आहे. खरे खोटे कुणास ठाऊक.

पण दरम्यान हायवेवरच्या झोपड्या जोरात वाढत आहेत. तसं पाहिलं तर अख्ख्या मुंबईच्या झोपड्या वाढत आहेत. मध्यमवर्गीय टीकाकार काहीही म्हणोत पण सध्या झोपडीवाल्या मुंबईवर आक्रमण चालू आहे. मुंबईला चारी बाजूने झोपडपट्ट्यांनी घेरले आहेच पण मुंबईच्या अध्यात मध्यातही झोपड्यांचे कोंब उगवू लागले आहेत. मुंबईचा कॉमन मॅन आता मध्यमवर्गीय नाही. तो आहे झोपडपट्टीवाला.

## सरकारी कर्मचाऱ्यांना योग शिकवणी

महाराष्ट्र सरकारने नुकताच एक फतवा काढून मुंबईतील सचिवालयाच्या कर्मचाऱ्यांना यौगिक व्यायाम शिकविण्यासाठी दोन वर्ग सुरू करण्याचे जाहीर केले आहे. कर्मचाऱ्यांचे शरीर कार्यक्षम ठेवण्यासाठी आणि त्यांना मनःशांती देण्यासाठी योग-व्यायामाचा चांगला उपयोग होईल असे या पत्रकात म्हटले आहे. हे योग-वर्ग कार्यालयाच्या कामकाजाच्या वेळेच्या आधी आणि नंतर भरतील.

झाले ते बरेच झाले. नाहीतरी सरकारी कर्मचाऱ्यांना मनःशांती टिकविणे आजकाल फारच कठीण झाले आहे. परवा सचिवालयात एका पत्रकार परिषदेसाठी वार्ताहर गेले होते. मंत्र्यांच्या खोलीतून परिषद संपवून वार्ताहर बाहेर पडले आणि छन्नमार्गातून ! (मराठी अर्थ—कॉरीडॉरमधून) जाऊ लागले.

झाले, एका बड्या अधिकाऱ्याची मनःशांती ढळली. वार्ताहर रेंगाळत जात होते. अधिकारी महाशय संतापले. त्यांनी हटकले, कसली गडबड चालवली आहे — चालू लागा भराभर. कॉरीडॉर खाली करा.

काही वार्ताहर गप्प बसले. असेल कुणी अज्ञ ऑफिसर बिचारा. म्हणून त्यांनी त्या अधिकाऱ्याच्या ओरडण्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. कोण हे दीडदमडीचे लोक. आपण आवाज काढताच यांनी खाली मान घालून निमूटपणे चालायला लागावे.

तर हे लोक आपणाकडे संपूर्ण दुर्लक्ष करीत आहेत. अधिकारी महाशय खवळले. कोण आहे रे तिकडे–धरा या लोकांना–

एका ज्येष्ठ वार्ताहराला हे जरा विचित्र वाटले, त्याने विचारले, 'काय प्रकार आहे–कोण हवंय आपल्याला ?'

आता मात्र अधिकाऱ्यांची मनःशांती पार बिघडली. ते ओरडले, 'दिसत नाहीत पाटचा या कॉरीडॉरमध्ये–उभे राहू नका म्हणून–चला चालू लागा.'

'ओरडतोय कोण, तुम्हीच ओरडत आहात.'

'कोण आहे रे तिकडे, सिक्युरिटी ऑफिसरला बोलवा. पकडा या सगळ्या लोकांना.'

'पकडूनच दाखवा. आणि तुमचा हाच स्वर कायम ठेवा–'

झाले. बाचाबाची वाढली. आवाज ताणले गेले. सचिवालयाच्या सहाव्या आणि चौथ्या मजल्याचा सगळा स्टाफ पाचव्या मजल्यावर गोळा झाला आणि आपल्या बॉसला काही लोक हमरी तुमरीवर येऊन भरपूर बोलून घेताहेत हे आयुष्यात कधीही न दिसणारे दृश्य बघून सारे लोक खूष झाले. तेवढ्यात राज्यगृहमंत्री बाहेर आले आणि त्यांनी हस्तक्षेप केला. खाली सिक्युरिटी ऑफिसरला कळले की पाचव्या मजल्यावर गडबड आहे–ते आपल्या स्टाफसह धावत आले. पाहतात तो वार्ताहर. ते मागल्या पावली परत गेले.

मंत्र्यांच्या खोलीत अधिकारी म्हणाले, पण साहेब, मी असं म्हणलोच नाही. मी म्हणालो, 'प्लीज मूव्ह डाऊन दि कॉरिडॉर.'

मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष, लोकसत्तेचे वार्ताहर कृ. पां. सामक या गडबडीत तिथेच होते. ते म्हणाले, तुम्ही आता तुमचा स्वर बदलला आहे.

सामक मंत्री महाशयांना म्हणाले, गेल्या वीस वर्षांत मी असा सिक्युरिटी ऑफिसर पाह्यला नाही–

अधिकारी एकदम नर्व्हस झाले. ते म्हणाले, 'अहो मी–मी पोलिसचा अधिकारी नाही हो, मी इथला सेक्रेटरी आहे–'

सामक म्हणाले, 'मग साहेब,तुम्ही एवढे मोठे साहेब असताना चपराशाचे काम करायला बाहेर कशाला आलात ?'

प्रकरण तेवढ्यावरच मिटले.

तेव्हा यौगिक व्यायामाची सचिवालयात येणाऱ्यांना कशी आवश्यकता आहे हे कुणासही पटावे. मंत्र्यापासून संत्र्यापर्यंत या यौगिक वर्गाची सक्ती झाली पाहिजे. त्यात सेक्रेटरीही पाहिजेत आणि कारकूनही. सचिवालयात येणाऱ्या वार्ताहरांनाही दारात शीर्षासन करून आत पाठविले पाहिजे. म्हणजे कुणाची मनःशांती ढळण्याचा धोका उरणार नाही.

□ □ □

## □ ऐतिहासिक पत्रबोध

श्री. मालोजीराव निंबाळकर यांनी 'मनमोहन' राजवाड्यात गणेशचतुर्थीच्या दिवशी पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण केले. या सुमुहूर्तावर श्री. मालोजीरावांचे माजी सन्मित्र यशवंतराव चव्हाण यांनी, त्यांचा एक लक्ष चाळीस हजार चारशे बेचाळीस रुपयांचा वार्षिक तनखा काढून घेतला! ज्या राजवाड्यातून आपल्या या मित्राबरोबर 'महाराष्ट्रापेक्षा पंडित नेहरू मोठे आहेत' ही इतिहासप्रसिद्ध घोषणा मालोजीरावांनी केली, त्याच राजवाड्याचे आर्थिक वैभव संपुष्टात आणण्याचे काम, पंडित नेहरूंच्याच मुलीने करावे व आता नेहरूपुत्रीचे आपण परमभक्त व मित्र असल्याचा देखावा यशवंतरावांनी उभा करावा, यामुळे मालोजीराव वाढदिवशी कष्टी होते यात नवल ते काय! भारताच्या लोकशाही जीवनात संस्थानिकांचे तनखे ही संतापजनक गोष्ट आहे, हे इंदिराजींचे मत पहिल्यापासून होते व पुरेशी सत्ता हाती येताच हे तनखे बंद करण्याचे पाऊल त्यांनी उचलले यात शंका नाही. वर्षाला पाच कोटी रुपये आता इंदिरा काँग्रेसवाल्यांना परदेश दौऱ्यासाठी वगैरे वापरता येतील. व देशाची मान परदेशात सारखी उंच उंच होत राहील! १९५० ते १९६४ या चौदा वर्षात, जेव्हा पंडितजी म्हणतील ती पूर्वदिशा अशी लोकसभेत परिस्थिती होती, त्या काळात ९० कोटी रुपये 'तनखा' म्हणून पंडितजींनी वाटले! पितृस्थानी होणारे हे पाप इंदिराजींना दिसत होते, परंतु त्यावेळी त्या राजकारणात सत्तेच्या आसपासही नव्हत्या. पण जे गणंग, गेली वीस वीस वर्षे सत्तेवर आहेत, अखिल भारतीय काँग्रेसच्या वर्किंग कमिटीचे सभासद आहेत, त्यांनी या पूर्वायुष्यात एकदा तरी या तनख्यांविरुद्ध गळा काढला होता काय? या गोष्टीचे मालोजीरावांना आश्चर्य वाटते. आम्हाला मालोजीरावांच्या अज्ञानाची खरोखर कीव येते. जोपर्यंत संस्थानिकांच्या राजवाड्यांची सावली काँग्रेसवाल्यांवर होती, मोठमोठे तनखेखाऊ हे काँग्रेसचे उमेदवार होते, तोपर्यंत तनखे कसे हो बंद करणार?

वाढदिवशी मालोजीराव म्हणाले–

'तनखे गेल्याचे वाईट वाटत नाही. परंतु दिलेला शब्द कोणत्या कारणाने मागे घेतला तेच कळत नाही. मात्र ज्या पद्धतीने तनखे रद्द केले त्याचे वाईट वाटते. बिल न मांडताही रद्द करता आले असते. जो देश आपल्या देशबांधवांना दिलेला शब्द पाळत नाही, त्या देशाच्या शब्दावर इतर देशांनी कसा विश्वास ठेवावा?'

ही चारपाच वाक्ये पुनः पुनः वाचून आम्हाला फक्त एवढाच अर्थबोध झाला की, 'तनखा गेल्याचे वाईट वाटते!'

बहुतेक संस्थानिक हे मूळचे मराठ्यांचे सरदार होते. ब्रिटिश राजवट आल्यानंतर या मंडळींनी पदरी मोठमोठे गायक, क्रिकेटखेळाडू वगैरे पाळले होते... ही




परंपरा जामनगरच्या महाराजांनी एकनाथ सोळकरला इंग्लंडमध्ये स्वखर्चाने पाठवले इथपर्यंत चालू आहे. परंतु पदरी कलावंत पाळणे, पशुपक्षी पाळणे... आणि दिलेला शब्द पाळणे यात खूपच फरक असतो. ज्या मध्यवर्ती शासनाच्या रक्षणासाठी आम्ही बांधलेले आहोत असा शब्द मराठेशाहीला सरदारांनी दिला होता तो त्यांनी पाळला असता तर एक तनख्यांचा प्रश्न तरी निकालात निघाला असता किंवा १८१८ पूर्वी इंग्रज तरी निकालात निघाला असता. पण यावद्दल या संस्थानिकांचा तरी काय दोष? दिलेला शब्द पाळण्याचे बाळकडू त्यांना 'पाळण्या'पासूनच दिलेले नव्हते. काय वाटेल ते पाळा पण 'शब्द पाळू नका' अशी सर्व चरित्रे आहेत. अपवाद असतील पण फार थोडे.

बडोद्याचे फत्तेसिंगराव गायकवाड ९ जाने. १९७० रोजी मरण पावले. त्यांची एक खाशी बायको अहिल्याबाईचे हे पत्र पहा. तुम्ही म्हणाल खाशी म्हणजे काय? पत्र वाचलेत की ही भानगड समजेल–

'आमचे धणी कैलासवाशी जालेनंतर मानाजीराव गायकवाड यांनी पंचवीस तीस लक्षांचे विते घरात होते ते लुटून नेले. आम्हास एका वस्त्रानिशी एक लहानसे घर होते – तेथेच टाकले. मग गोविंदराव गायकवाड आले. त्यांनी आमची खाया-खर्चाची नेमणूक बंद केली.

दुसरे. आमचे धण्यास एकशेसाठ बायका होत्या. त्यात चौघी खाशा. गोविंदराव गायकवाड याणी सर्व बायका काढून दिल्या आणि आमची चौघीची गत केली...'

शब्द न पाळल्याबद्दल वगैरे संस्थानिक मंडळींनी काही बोलू नये हे उत्तम. आता या गोविंदरावाने हाकलून दिलेल्या फत्तेसिंगरावांच्या एकशेसाठ बायका! यांचे पुढे काय झाले असेल? या बहुधा खिडकीत गेल्या असतील नाही तर बुरख्यातील गुलाम झाल्या असतील. या सर्वांना फत्तेसिंगाने शब्दच दिला होता ना? तेव्हा हे चालायचेच श्रीमंत.

इंदिरा सरकारने शब्द न पाळल्याचे आम्हाला तितकेसे वाईट वाटत नाही. आम्हाला काळजी एकच आहे – आता कलावंतांना श्रीमंत माहेरे कुठे लाभतील? संस्थानिकांना निदान समस्त दुर्गुणांसमवेत, कलावंत, विद्वान व खेळाडू यांना तरी पाळण्याचे व्यसन होते. परंतु ज्यांना स्वतःची खुर्ची पाळण्यापलीकडे कसलेच व्यसन नाही ते स्वतःच्या 'भाटां'पलीकडे कुणाला पाळतील असे वाटत नाही.

तनखे बंद झाले या ऐतिहासिक घटनेचा आम्हाला एवढाच बोध होतो. □ □ □

# जलमय बंगाल

दुर्गापूजेचा सण अगदी तोंडाशी आला असतानाच पश्चिम बंगालमधल्या लोकांच्या तोंडचं पाणी पावसाच्या अविरत कोसळणाऱ्या पाण्याने पळवलं आहे. मुळात बंगाल म्हणजे सहस्रावधी तळ्यांचा आणि कमळांचा देश. पहावं तिकडे हिरवी-गार वनश्री आणि संथ हिरवं निळं पाणी अशी इथली स्थिती. पण सप्टेंबर महिना उगाडला आणि सर्व बंगालवर सतत बहात्तर तासांची वृष्टी झाली. इकडची जुनी माणसं सांगतात की असली दमछाक करणारी अस्मानी-सुलतानी गेल्या तीस-चाळीस तरी वर्षात झालेली नाही. सध्या बंगालमध्ये जे जे घडतंय ते अपूर्वच आहे. कलकत्ता हे बंगालमधील एकमेव मोठं शहर मध्यवर्ती आहे आणि हौरा, हुगळी, मिदनापूर, चोवीस परगणा वगैरे जिल्हे कलकत्त्याच्या सभोवार आहेत. कलकत्ता हुगळी, म्हणजेच गंगा नदीच्या तिरावर वसलेलं आहे. हुगळीला पूर आल्यामुळे कलकत्ता अलग पडलं. फक्त हौरा पुलावरूनच काय तो बाजूच्या हौरा जिल्ह्याशी संपर्क साधता आला.

खुद्द कलकत्त्याच्या झाडून साऱ्या वस्त्या नि झोपडपट्ट्या पाण्याच्या खाली होत्या. गुडघाभर पाणी चार दिवस साचून राहिले नाही असा एक रस्ता नव्हता. ट्रॅम, बसेस, टांगे, रेल्वे वगैरे सर्व वाहनं पूर्णपणे बंद होती. बिहार आणि ओरीसा-मधून पोटासाठी रिक्षा ओढायला आणि नंतर रक्त ओकत ओकत मरायला कल-कत्त्यात आलेले कंगाल रिक्षावाले मात्र छातीभर पाण्यातून रिक्षा ओढत होते. ह्या आठवड्यात त्यांना जे काही चार पैसे मिळायचे होते ते मिळाले. एरव्ही बेकार रिक्षावाल्यांचे तांडेच्या तांडे गिऱ्हाईकांची वाट पहात कोपऱ्या कोपऱ्यावर बसलेले असतात. आता खुद्द कलकत्त्यात लष्करी पंप लावून तुंबलेले पाणी झपाझप खेचून बाहेर टाकले जात आहे. कलकत्ता ह्या एका शहरात आज पन्नास हजार लोक बेघर झालेले आहेत. काहींनी सरळ यार्डातल्या रेल्वेच्या डब्यात वस्ती केली आहे. अनेकजण रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर तट्ट्यांचे आडोसे करून मदतीची वाट पहात आहेत. पूर आल्यामुळे हौरा आणि सिल्दा ह्या दोन्ही रेल्वे स्टेशनावरून तीस गाड्या पुढील सूचनेपर्यंत रद्द करण्यात आल्या आहेत, कारण सर्वत्र रेल्वेमार्गावर पाणी साचलं आहे. हौऱ्याच्या परिसरात दीडशे मिटर लांबीचे रूळ वाहून गेले आहेत. काळीघाट, हजरा, तांग्रा वगैरे भाग जलमय होता. हाजरा रस्त्यावरलं महाराष्ट्र निवास पाण्यात होतं. निवासातली गणेशाची मूर्ती आणणेही बिकट झाले

होते. अन्यत्र इकडे कुठे गंभीरयुजन नाही. तांग्रा भागात अजूनही पाणी तुंबलेले आहे.

चोवीस परगणा विभाग पूर्णपणे अलग पडला आहे. तिथे साडेचार लाख लोक बेघर झाले आहेत. तिथे चौदा लोक पोटदुखीने मेल्याची बातमी आहे. त्यांना वैद्यकीय मदत, वाहनव्यवस्थेच्या अभावी मिळू शकलेली नाही. कॉलऱ्याची लागण झाली असल्याच्याही त्रस्त करणाऱ्या बातम्या आहेतच. तशात पूर आलेल्या मुंगेश्वरी नदीच्या पात्रात अचानक भोवरे सुरू झाले आहेत. त्यामुळ लष्करी पडाव पलीकडच्या काठाला लागू शकत नाहीत. ह्या ना त्या मार्गाने वैद्यकीय मदतीच्या दहा तुकड्या चोवीस परगण्यात गेल्या आहेत. ह्याच भागातल्या डमडमलाही धोका निर्माण झाला आहे. असं असूनही लष्कराने दहा पडाव चोवीस परगण्याच्या दिशेने पाण्यात सोडले आहेतच.

हुगळी जिल्ह्यातील आरामबाग तहशिलीचे सर्वात जास्त नुकसान पुरांनी केले आहे. चारी बाजूंनी पाण्याने वेष्टीलेल्या ह्या भागात हेलीकॉप्टरने खाद्यपदार्थ टाकले जात आहेत. सात ट्रक्स भरून वैद्यकीय सामान रस्ते मोकळे होण्याची वाट पहात आहेत. बिरभूम, बरद्वान ह्या सर्व भागात कपडे पाठवले जात आहेत.

ह्या अनर्थ चालू असतानाच, दामोदर नदीचे पात्र फुगले! त्यामुळे दामोदर धरणाला धोका निर्माण झाला. तेव्हा ते फुगवट्याचे पाणी पानचेट (पानशेत नव्हे) धरणाच्या झडपांमधून सोडून देण्यात आले. ते तडक पुन्हा हुगळी आणि हौरा जिल्ह्यात घुसले. मूळचे पावसाचे पाणी. त्यात ही दामोदर नदीच्या पूर-पाण्याची भर. त्यामुळे हौरा आणि हुगळी ह्या दोन जिल्ह्यांची परिस्थिती केविल-वाणी झाली आहे. विशेषतः गुराढोरांच्या जीवाला चाऱ्याच्या आणि शुद्ध पाण्याच्या अभावी फारच धोका निर्माण झाला. दामोदर व्हॅली कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. राघवाचारी ह्यांनी धरणाला धोका निर्माण झाल्यामुळे पूरपाणी मुक्त करण्या-शिवाय इलाजच नव्हता असे पत्रक काढले आहे. अजूनही पानचेट धरणातून पाणी सोडले जातच आहे. मात्र राज्यसरकारच्या विनंतीवरून हे प्रमाण कमी कमी होत आहे.

पश्चिम बंगाल सरकारने पूरग्रस्तांना मदत म्हणून बावीस लाख चौसष्ट हजार रुपये मंजूर केले आहेत. लोक कपडे, अन्नधान्य पाठवीत आहेत. मानवता संघ, कॅथॉलीक सेवा संघ, अखिल बंगाल शिक्षक संघ, मारवाडी सेवा संघ, रामकृष्ण मिशन, भारत सेवाश्रम संघ वगैरे संस्थांतर्फे मदतकार्य जारीने सुरू आहे.

हस्नबाद, बशिरहाट आणि बॉनगाव ह्या तीन ठिकाणी पूर्व पाकिस्तानच्या निर्वासितांच्या छावण्या आहेत. त्यांची ह्या पुरांनी दशा दशा करून टाकली आहे. सॉनॉर बाँगलाच्या दिशेने मोठ्या आशेने आलेल्या ह्या निष्कांचन खेडुतांच्या ओंजळीत निसर्गाने फक्त पुराचं गढूळ पाणी आणि चिखलच काय तो टाकला!

— प्रतिनिधी

आज हा प्रश्न आहे मुंबईचा.
दीड लाख नोकरांचा.
त्यांची सेवा घेणाऱ्या साडेसहा लाख कुटुंबांचा.
ज्यांची कोणतीही संघटना नाही,
ज्यांच्यामागे कोणताही राजकीय पक्ष नाही अशांचा.

आज तो फारसा भेडसावणारा नाही.
म्हणूनच तो कमी महत्त्वाचा वाटेल,
परंतु त्याचं गांभीर्य हळूहळू वाढत आहे.
पुढे-मागे एखादा राजकीय पक्षही त्यात उतरेल,
आणि हाच प्रश्न मुंबईकरांना हैराण करून सोडील.

गेल्या आठवड्यात मुंबईच्या
'संदेश' या गुजराथी दैनिकाने हा प्रश्न प्रथम हाताळला.

सु. ल. सोमण यांनी
या संबंधात काहींच्या भेटी-गाठी घेऊन
अधिक विस्तृतपणे हा विषय मांडला आहे.

# रामा गडी

मुंबईत कुठला प्रश्न केव्हा आणि कशाप्रकारे उपस्थित होईल आणि त्याच्यावर विचारमंथन सुरू होईल हे सांगता येत नाही. मुंबईचे प्रश्नही तसेच वेगळे, काहीसे चमत्कारिक. आज ज्या विषयाला हात घालायचं ठरवलं आहे तोही असाच अनपेक्षितपणे माझ्यापुढे आला. त्या प्रश्नाच्या संदर्भात एका घरात सात–आठ जणांमध्ये

चालू असलेली चर्चा मला ऐकायला मिळाली. घरगड्यांच्या प्रश्नांविषयीची ती चर्चा 'संदेश' ह्या गुजराथी साप्ताहिकातील प्रसिद्ध झालेल्या बातमीमुळे घडून आलेली! ह्या घटनेनं उत्सुकता चाळवली म्हणून नंतर काही ठिकाणी मुद्दाम चर्चा करून घरगड्यांचा विषय समजून घ्यायचा प्रयत्न केला. काही घरातनं मुद्दाम डोकावलो तर कानावर आलेले संवाद ह्या नव्या संदर्भात पुन्हा उजळून बघितले. जवळजवळ दीड लक्ष घरगड्यांचा (आणि बायांचा) आणि त्यांची सेवा घेणाऱ्या सुमारे सव्वासहा लक्ष कुटुंबांचा हा प्रश्न! हा प्रश्न तसा आज फारसा भेडसावणारा वाटत नाही; परंतु त्याचं गांभीर्य मात्र वाढायला लागलं आहे आणि वेळीच योग्य त्या दिशनं पावलं उचलली गेली नाहीत तर हा प्रश्न मुंबईकरांना हैराण करून सोडील ह्यात मात्र शंका नाही! मुंबईतल्या मिळवत्या दांपत्यांची संख्या जसजशी वाढत जाईल (ती कुठल्या गतीनं वाढते आहे ते का सांगायला हवं? रोज एक कुटुंब असं वाढत आहे म्हटलं तर अतिशयोक्ती ठरू नये!) तसतसा हा प्रश्न अधिकाधिक तीव्र होत जाईल, आणि त्याच कुटुंबामध्ये आणि त्यात राबणाऱ्या घरगड्यांमध्येच त्याची तीव्रता वाढत जाईल. 'मलबार हिल'च्या अलिशान बंगल्यातनं वावरणारे आणि त्यांच्याकडचे 'Boys' ह्यांचा अर्थातच हा प्रश्न राहणार नाही....

...घाटकोपरच्या मध्यमवर्गीय गुजराथी समाजातलं एक घर! मराठी मध्यमवर्गीयांपेक्षा फारसं भिन्न नाही. माणूस एक सामाजिक कार्यकर्ता. सात-आठ जणं जमली होती. मी अनाहूतपणे हजर होतो. श्री. डाह्याभाई शहांनी काही दिवसांपूर्वी माझ्यासमोर हा घरगड्यांचा प्रश्न मांडला होता. 'संदेश' मधला वार्तालेख मला दाखवला होता. त्याच अनुषंगानं ही चर्चा चालू होती. 'संदेश'च्या वार्ताहरानं लिहिलं होतं,... 'एस्प्लेनेड कोर्टात बसल्या बसल्या 'मे'च्या रिमान्ड अर्जांवरून सहज नजर फिरवली...ह्या अवधीत कमीत कमी साठ ते सत्तर केसेस अशा नोंदवल्या गेल्या होत्या की ज्यात घरगड्यांवर वहीम होते...कुणी सुटलेले, कुणी पुढील तारखेची वाट बघत असलेले, तर कुणी जामिनावर सुटलेले...काही तक्रारींबाबत वहीम घेतलेले घरगडी बेपत्ता होते- पोलिस त्यांच्या तपासात होते...' ह्यानंतर 'संदेश' वार्ताहरानं वेगवेगळ्या चोऱ्यांचे पाच-सहा किस्से कथन केले आहेत. पोलिसांनाही घरगड्यांच्या ह्या 'पराक्रमां'ची पुरेपूर जाणीव असते असंही वार्ताहर पुढे म्हणतो. त्यानंतर देशोदेशीच्या घरगड्यांविषयींच्या पद्धतींना स्पर्श करून, वार्ताहर, शासनानं ह्याबाबत पावलं उचलावी असं म्हणतो आणि शेवटी...'ए संदर्भमां आ नोकरनी चोरीनी समस्या हल करवा कईक विषद योजना हाथ धरवी जरूरी छे.' असं म्हणून वार्तापत्र संपवतो. (...ह्या संदर्भात ह्या घरनोकरांच्या चोरीच्या समस्या कमी करण्यासाठी अनेक योजना हाती घेण्याची जरुरी आहे.)

ह्या संपूर्ण वार्तापत्रात घरगडी चोऱ्या करतात हाच जणू एकमात्र प्रश्न अस-

त्याचा भास निर्माण केला गेला आहे. घरगड्यांची सेवा घेणाऱ्यांच्या दृष्टीने कदाचित तो महत्त्वाचा असूही शकेल. परंतु ह्या घरगड्यांचं जीवन, त्यांचं राहणीमान वगैरे त्यांचेही काही प्रश्न असतील ह्याचा मात्र सोयिस्कररीत्या विसर वार्ताहराला पडलेला दिसला. परंतु सुदैवाने ज्या चर्चामंडळात हा विषय चर्चिला गेला त्या चर्चा मंडळाला मात्र घरगड्यांच्या ह्या प्रश्नांतही आस्था दिसली. चर्चेचं सूत्रसंचालन ह्याच भावनेतून होत होतं. एकंदर सूर असा दिसला की, घरगड्यांची एखादी संस्था असावी, ह्या संस्थेजवळ घरगड्यांची इत्थंभूत माहिती असावी; त्यांचं नाव, गाव, वय, वर्ण, उंची वगैरे वगैरे, त्यांना मिळणाऱ्या नोकऱ्यांचं संचालन ह्या संस्थेमार्फत व्हावं, विभाग निहाय त्यांचे कामाचे दर संस्थेनं बांधून द्यावेत. 'ह्याचा फायदा असा होईल,' श्री. डाह्याभाई शहा सांगत होते की, 'ज्यांना जसा घरगडी हवा तसा तो मिळू शकेल. संस्था जबाबदारी स्वीकारीत असल्याने ते चोऱ्या करतात ही सध्याची समस्याही राहणार नाही...कामाचे दर बांधून दिल्यामुळे घरगड्यांची आर्थिक पिळवणूकही थांबू शकेल व त्यांचेही प्रश्न सुटायच्या मार्गाला लागतील...' अशा संस्थेचं अर्थकारण अर्थातच काही प्रमाणात 'चॅरिटी'वर व काही प्रमाणात ज्यांच्याकडे घरगडी पुरवायचे त्यांच्याकडून मिळणाऱ्या मोबदल्यावर उभारलेलं होतं. 'असा मोबदला द्यायला लोक तयार होतील का?' ह्या प्रश्नावर श्री. शहा म्हणाले, '... घरगड्यांची जर खात्री पटली की ह्या संस्थेतर्फे गेल्यास पैसा बरा मिळतो तर ते संस्थेमार्फतच नोकरी शोधू पाहतील. तर संस्थेतर्फे मिळणाऱ्या घरगड्यांवर घर निर्धोक सोपवता येतं असं लोकांना पटलं तर ते, वेळी दोन पैसे खर्चूनही संस्थेकडेच धाव घेतील...' श्री. डाह्याभाईंकडून बाहेर पडलो तेव्हा मनाची अशी खात्री झाली होती की, डाह्याभाई अशा संस्थेच्या उभारणीच्या प्रयत्नांना लागलेही असावेत...

मुंबईत घरगड्यांची संघटना उभारण्याचा हा पहिलाच प्रयत्न मात्र नाही. किंवा अशी एखादी संघटना अस्तित्वात नाही असंही नाही. परंतु मोठी प्रातिनिधीक संघटना मात्र घरगड्यांची नाही. ज्या आहेत त्या त्यातल्याच किंवा आजूबाजूच्या 'दादां'नी चालवलेल्या विस्कळीत संघटना आहेत. त्यांच्याजवळ खास कार्यक्रम नाहीत. सणांना व साप्ताहिक सुट्टया असाव्यात, वेतन अधिक असावं असल्या काही किरकोळ बाबींवर त्यांचं लक्ष केंद्रित असतं. नि ते साहजिकही आहे. परंतु ह्याही बाबींवर लढे उभारण त्यांना शक्य नसतं. ह्या ज्या दोन-चार किरकोळ संघटना आहेत त्यांना योग्य मार्गदर्शन नाही; योग्य नेतृत्व नाही. अर्थात ह्या परिस्थितीत ह्या संघटना असून नसल्यासारख्याच आहेत. त्यांचा आवाज त्यांच्या सभासदांपर्यंत तरी पोचत असेल की नाही ह्याचीच शंका! तसा तो पोचत नाही म्हणूनच दीड लक्षाएवढी प्रचंड संख्या असूनही हा श्रमिक आज विस्कळीत आहे. तो उपेक्षणीय

पृष्ठ ५१ वर

'भुवन सोम' चित्रपटाला राष्ट्रपती पारितोषिक मिळाले. 'सारा आकाश' हा बासु चतर्जी निर्मित-दिग्दर्शित चित्रपट या स्पर्धेत मागे पडला आणि त्याची बिनरंगीत छायाचित्रणाच्या एकुलत्या एका तांत्रिक पारितोषिकाने संभावना करण्यात आली. मुंबईतील चित्रपट-वर्तुळातून या दोन चित्रपटांविषयी सतत चर्चा चालू आहे. यातील कोणता उजवा? कित्येकांच्या मते सारा आकाश उजवा आहे. हा सारा आकाश चित्रपट आहे तरी कसा आणि कशाविषयी?

# सारा आकाश

रातराणी । रातराणी

विजय तेंडुलकर

'सारा आकाश' एका विशीतल्या तरुण मुलाविषयीचा चित्रपट आहे. या वयात अनेकदा माणसाच्या कानात वारे आणि डोक्यात कसले तरी आत्यंतिक वेड असते–निदान अपेक्षित असते. असा हा मुलगा आहे. हा देशभक्तीच्या वेडाने झपाटलेला आहे. त्याला मोठा कसला तरी त्याग करायचा आहे. देशासाठी देहाचा कण न् कण झिजवायचा आहे. राणा प्रताप, भगतसिंग, सुभाषचंद्र बोस असले त्याचे आदर्श आहेत. या आदर्शांच्या मस्तीत तो जगतो आहे. त्याला दुसरे तिसरे काही

समजत नाही. साधे हसणेदेखील जणू तो विसरून गेला आहे, मग खेळण्याचे काय ? कुडता लेंगा घालून तो आपल्याच नादात जगतो, वावरतो. विचार करतो. खूप अभ्यास करतो. बेचैन रहातो. देशाचे काय ?

आणि त्याच्या घरी वेगळेच खल चालतात, या मुलाचे काय ? हा असा राहिला तर बहुतेक वाया जाईल. कोणाचे धड ऐकत नाही. घरात असून नसतो. कोणाशी मोकळा बोलत नाही. गप्प गप्प असतो. वेडाबिडा तर होणार नाही ? बूट निघतो, त्याचे एकदाचे लौकर लग्न करून द्यावे म्हणजे ताळ्यावर येईल. बायको आली की मुकाट संसारात बसेल, चार चौघांसारखा जगू लागेल. घरच्या पारंपारिक वातावरणानुसार रीतसर एक बऱ्या घरची बरी मुलगी ठरवण्यात येते. आणि लग्नाची तीथ ठरते.

मुलगा आईवडलांसमोर मोकळेपणी बोलू शकत नाही. ते मुळी त्याला कालचे पोर नाहीतर कुक्कुले बाळच समजतात. मोठा भाऊ लक्ष देणारा नसतो. लग्न होऊन माहेरीच रहाणारी बहीण प्रेमाने ऐकणारी असते पण तिला ऐकवून उपयोग काय ? एक वहिनीच काय ती ऐकवावेसे वाटेल अशी; पण तिला ऐकवून परिणाम होत नाही. तीच उलट उपदेश करते, भावजी, वेळच्या वेळी गोष्टी झालेल्या बऱ्या असतात. लग्नात काय वाईट आहे ? तुमच्या मोठ्या भावाचे काय वाईट झाले, सांगा ?

कोणीच मानीत नाही. त्या तरुण मुलाला घुसमटायला होते. कोणालाच काय ते समजू शकत नाही. अखेर लग्न होतेच. वाजत गाजत, रीतीसारखे होते. लग्ने जशी होत आली तसे होते. तरुण पोरसवदा नायकाच्या मनात मात्र राग असतो. वांझ राग असतो. या रागाने काही लग्न व्हायचे टळलेले नसते. वा रागाची कोणीच पर्वा करीत नाही, कोणी याला भीक घालीत नाही—वहिनीदेखील नाही. या रागाला मोकळी वाटदेखील मिळू शकत नाही. मग हा राग आत आत रुतू लागतो आणि लग्न होऊनही नायक कार्तिकस्वामी रहातो. तो त्याच्या नववरिणीत वधूला सामोरा होऊ शकत नाही. स्त्री-पुरुष संबंधाच्या कल्पनेचाही त्याला उबग येतो. त्याला ती कल्पनाही अनैतिक, अनुदात्त वाटते. पशुवृत्तीची निदर्शक वाटते. शरीरसंबंध नामक या पाशवी कृतीला अज्ञानी समाज देतो ते एखाद्या विधीचे आणि खेळाचे रूप त्याला घाणेरडे भासते. आणि ही गोष्ट तो आग्रहाने टाळू लागतो. या गोष्टीचे प्रतीकच अशा त्याच्या त्याच्याहून पोरसवदा नवयौवना बायकोला तो टाळू लागतो. याच वेळी तारुण्यसुलभ अशा नैसर्गिक इच्छा, भावना, वासना रक्तात फिरतच असतात. भोवतालच्या तरुणांच्या जगात जे बोलले जाते, कल्पिले जाते त्याचे पडसाद त्याच्या संवेदनात उठतच असतात. या चमत्कारिक कात्रीत सापडून तो आणखीच घुम्या, तिरसट, सदा घराबाहेर राहू बघणारा आणि एकलकोंडा होतो. घरात, घराबाहेर तो कुठे मिसळू शकत नाही, मोकळा बोलू-वागू शकत नाही. आपल्याला काय होते हे

त्याचे त्याला कळेनासे होते. बायकोचे तोंड पाहणेही त्याला नको वाटते आणि ते न पाहिल्याचा त्रासही होत रहातो. यातच बायकोला सिनेमाला ने, तिच्याबरोबर खोलीत झोप, असल्या सांसारिक कर्तव्यांचा जुलूम चालू असतो आणि यातून तिच्या-विषयीचा आकस आणखी आणखी खोल रुतत असतो. भयंकर त्रास होतो. वाटते की ही जन्मठेप आहे, सारे फोडून तोडून पळन जावे. पण जमत नाही. पुन्हा पाय घरी, खोलीत ओढत आणतात. फडताळात झाकून ठेवलेले जेवण खावेच लागते. केरात सापडलेला केसातला आकडा अभ्यासाच्या पुस्तकात हाती लागतोच आणि मग दाराला आतून लावून घेतलेली कडी उगीच काढून ठेवावीशी वाटते. देशभक्तीने व्यापलेल्या मनात भलतेच काही सुरू होते–नको नको म्हणता सुरू होते. पुरे म्हणता थांबत नाही. आणि प्रत्यक्षात कोणी येत नाही. कधी यावे लागलेली, कधी आलेली ती झिडकारली गेलेली असते, ती पुन्हा येतच नाही. ती घरकामात झिजत, सासू-सासऱ्यांची बोलणी खात मोठ्या घरात कोठे तरी चिरगूट अंथरून एकटीच झोपते. हा इकडे तळमळतो.

ध्येयवादाच्या खऱ्याखोट्या ध्यासात आयुष्यातले बरेवाईट वास्तव नाकारणाऱ्या एका सर्वसामान्य भारतीय तरुणाची ही गोष्ट एल्व्हांना होते. प्रत्येक माणसाला एक लैंगिक जीवन असते याचाच त्याला दादपत्ता नाही, तो कोणी वडीलकीने त्याला देतही नाही. तो दिला पाहिजे असे त्याचे लग्न करून दिल्यावरही कुणाला वाटत नाही. त्याच्यात ध्येयवादाबरोबरच आसक्ती आणि वासना आहेत परंतु त्यांचे अस्तित्व त्याला पाप वाटते. स्त्रीपुरुष-संबंध त्याला गलिच्छ वाटतो. एका अर्थाने हा तरुण मुलगा आजवरच्या अनेक पांढरपेशा पिढ्यांचे प्रतिनिधित्व करतो असे म्हणता येईल. एकूण जीवनातील मूलभूत अशा लैंगिक जीवनाविषयीचे घोर अज्ञान वा अर्धवट ज्ञान आणि अशा जीवनाचे अस्तित्वच नाकारणारा मूर्ख ध्येयवाद हे या पिढ्यांचे आयुष्याच्या प्रवासाचे भांडवल रहात आले. मग अतिशय नैसर्गिक अशा वासनांनी अतिशय अनैसर्गिक वळणे घेतली. समाजधारणेचे एक अंग असे लैंगिक जीवन वेगवेगळ्या बुरख्यांखालचे लाजिरवाणे पाप बनले. त्याचे गंड (Complexes) तयार झाले. अनेक प्रकारांनी ते अनेकांना हानीकारक ठरले. आणि तरीही लैंगिक जीवन वा त्याची मागणी याविषयी प्रत्येकजण एकाद्या अनैतिक भानगडीइतके रहस्यपूर्ण, 'आळीमिळी'चे वातावरण निर्माण करून जगला. आज ही कोंडी अशी ना तशी, चित्रपट, साहित्य इत्यादींमुळे फुटली आहे; तरीही प्रौढ पिढ्या भावी पिढ्यांना शास्त्रशुद्ध, सुजाण लैंगिक जीवनाची रीतसर शिकवण देण्याला आजही राजी नाहीत. चुकीच्या पद्धतीची जाण गाठीस ठेवूनच नव्या पिढ्याही आपल्या आयुष्याचा आरंभ करीत आहेत. अनेक शरीरे, मने यापायी चुरगळून कोमेजून गेली आणि जात आहेत. अनेकानेक यौवने दुःखीकष्टी होऊन कुढत, तळमळत, पिचत आहेत; लौकिक जीवनात विकोपाला जाऊ बघत आहेत, एकांगी बनत आहेत.

एक साधी, सरळ गोष्ट सांगण्याच्या निमित्ताने 'सारा आकाश' या पिढ्यापिढ्यांच्या विदारक सत्यावर नेमके बोट ठेवतो. अशा प्रौढत्व येऊनही अजाण राहिलेल्या शरीर-मनांच्या व्यथांना स्पर्श करतो, त्या साजेशा हळूवार कलात्मकतेने पडद्यावर मांडतो.

नायकाचे पुढे काय होते ? काही नाही, एका रात्री दडपून ठेवलेले सारे क्षुल्लक निमित्तानें, एकदम उफाळते, हरवलेले गवसते आणि नायकनायिकेचा मेळ जमून तो सुखी होणार याची सूचना मिळते आणि चित्रपट संपतो. तसे म्हटले तर घटना अशा या चित्रपटात विशेष नाहीतच आणि ज्या आहेत त्या तुमच्या माझ्या आयुष्यासारख्या एका चाकोरीत घडू शकणाऱ्या. लग्न, पहिली (वाया गेलेली) रात्र, बारीक सारीक नाराज्या आणि संताप, घरातल्या कोणाचे तरी डोहाळजेवण, बाळंतपण, क्षुल्लक संघर्ष, नित्य नैमित्तिक लागट आणि लोभस बोलणी, घरकामांचे तपशील आणि त्यांचा कधी न संपणारा रगाडा आणि पोटार्थी नाहीतर विद्यार्थी जीवनाची चाकोरी, एवढेच या चित्रपटाचे कथेपुरते तसे म्हटल्यास भांडवल. पांढरपेशा जीवन हा या चित्रपटाचा विषय आणि हीच त्याची मर्यादा. यात होऊन होऊन होते काय तर नायकाच्या, नवऱ्याने टाकलेल्या बहिणीला तिचा बेपत्ता नवरा अकस्मात येऊन घेऊन जातो. तिला पाठवावे की नाही यावर झालेला खल हाच या एकूण जीवनातील सर्वात मोठा ताण. तिला पाठवण्याचे ठरते हा ऐतिहासिक महत्त्वाचा निर्णय. थोडक्यात, या चित्रपटाच्या कथावस्तूचा जीव फार मोठा नव्हे.

ही अशी, काहीशी हलक्या जिवाची, फार मोठे नाट्य नसलेली कथा घेऊन दिग्दर्शक बासु चतर्जी यांनी तिचे खरेच सोने केले आहे. एक म्हणजे, तिचे बळ किती आणि कोठे आहे ते त्यांनी स्वतः उत्तम जाणलेले आहे. तिच्यात त्यांनी उपरे नाट्य ओतलेले वा साधे शिंपडलेलेदेखील नाही. असलेलेच उघड, सुप्त, छोटे छोटे नाट्यपूर्ण क्षण हेरून कॅमेऱ्याच्या मर्मज्ञ नजरेने त्यांनी ते आपल्याला दाखवले आहेत. हे करताना त्यांनी प्राधान्य अशा क्षणांच्या नैसर्गिकतेला दिले आहे, तांत्रिक क्लृप्त्यांना नाही आणि तरीही माहीत असलेल्या सर्व तांत्रिक क्लृप्त्या त्यांनी वापरल्या आहेत; मात्र त्या असे क्षण प्रभावी करण्यासाठी, कथेतील सुप्त नाट्याचा वेध घेण्यासाठी. हे नाट्य आग्रा शहरी घडते पण तरी आपले वाटते. ज्या सहाजिकपणे, उत्स्फूर्तपणे ते समोर येते त्याने ते येता क्षणी आपल्याला भिडते, आपल्याला गुंतवते, गुंतलेले ठेवते. आपण तटस्थ प्रेक्षक रहात नाही, कथेतला नायक नाहीतर नायिका नाहीतर बाप नाहीतर आई बनतो. ही कथा, तिच्यातले बारीक सारीक तपशील आपण पहात नाही, अभावितपणे आपण ते जगत जातो. ते घर नकळत आपले होते. ती आयुष्ये आपली होतात. बासु चतर्जी यांचे यश यात आहे. त्यांनी चित्रपट आपल्यापुढे ठेवलेला नाही, आपल्यालाच त्यांच्या चित्रपटात नेऊन सोडण्याची चोख व्यवस्था केली आहे.

चित्रपटाची अशी खरीखुरी भाषा कोणती? शब्दांची नव्हे, दृश्याची. चतर्जी यांनी हे ओळखले आहे. त्यांची दृश्ये बोलतात. घरच्या मोठ्या माणसांच्या आग्रहावरून नायक-नायिका मध्यंतरी वीसेक पावलांचे अंतर ठेवून 'जोडप्याने' सिनेमाला निघालेली असता चतर्जी दोघांना कॅमेऱ्यात दोन टोकांना जेमतेम धरण्याची आपण कशी शिकस्त करीत आहोत हे एकाद्या नवशिक्या कॅमेरामनप्रमाणे मुद्दामच दाखवतात; प्रसंगाची मौज वाढवतात. आणि यात सिनेमा जाहिरातीची एक ढकलगाडी जेव्हा 'जिगरी दोस्त' अशी मोठाली अक्षरे मिरवीत दृश्यात शिरते आणि दृश्याबाहेर निघून जाते तेव्हा जणू अभावितपणाचा बहाणा करीत चतर्जी एक सुरेख चिमटा घेऊन जातात.

नायकाच्या लग्नविधीत ऐन वरातीत त्याच्या मनात रामदासस्वामीसारखे पलायनाचे येणारे विचार चतर्जी नुसतेच ऐकवीत नाहीत; तर वरातीचेच म्युझिक चालू ठेवून बँडवाले रस्त्याऐवजी एकदम ते चक्क एका माळावरून बँड वाजवीत चालत येताना दाखवतात. पुढे नायक लांबलांब ढांगा टाकीत बँडवाल्यापासून लांब कॅमेऱ्याकडे धापा टाकीत धावत येतो आहे आणि तरी त्याचे धावणे जणू एकाच जागी चालले आहे. या दृश्याबरोबर नायकाचे शब्दही ऐकू येतात, पळ! आताच पळ नाहीतर अडकलास! वाट कसली पहातोस? अरे पळ म्हणतो ना...पळ... बोहल्यावरच्या ध्येयवादी नायकाच्या मनी चाललेली त्याच्या मित्रांतोंडची काल्पनिक निर्भत्सना ऐकविताना चतर्जी मंडपातले नवविवाहित जोडपे तसेच, त्याच साजानिशी नायकाच्या वर्गात बाकावर, इतर मुलांच्या गर्दीत नेऊन मांडतात; आणि पुन्हा ते लगेच मंडपात बोहल्यावर दाखवतात.

नायकाचा फूटबॉलवेडा मित्र सामन्याचे साग्रसंगीत वर्णन करीत असता नायकाच्या हरवलेल्या मुद्रेवर आणि मित्राच्या साग्रसंगीत मूक हावभावांवर चतर्जी नायकाचे वेगळेच व्यग्र स्वगत विचार ऐकवतात. आणि मित्राने अखेर हटकताच नायकाबरोबर आपणही भान येऊन जरासे संकोचतो कारण असे आपलेही कधी तरी होते. नायकाचे नीरस कोरडे वैवाहिक जीवन आणि ट्रान्झिस्टर रेडियोच्या किंवा सिनेमाच्या निमित्ताने या जीवनाशी जोडून येणारी गुळगुळीत रोमँटिक शृंगारिक दृश्ये यांतून चतर्जी फार मजेदारपणे कथेचा उत्कर्ष साधतात. त्यांच्या दिग्दर्शनाचे दुसरे मोठे वैशिष्टय म्हणजे या युक्त्या योजतानाच त्या फार किंवा सवंग न वाटाव्यात याचे भान त्यांनी ठेवलेले दिसते. काही ठिकाणी ते चित्रीकरणासाठी अगदी सरळसोट, पारंपारिक, कोणत्याही सर्वसाधारण कौटुंबिक चित्रपटात चालेल अशी शैली स्वीकारू शकले आहे, ते हे भान असल्यानेच. म्हणजे त्या त्या प्रसंगी आवश्यक ती पद्धत किंवा शैली वापरून इच्छित परिणाम साधणे या एकाच उद्दिष्टाने त्यांचे दिग्दर्शन घडते. त्यात कोणत्याही शैलीचा किंवा स्वतःची स्वतंत्र शैली निर्माण करण्याचा अट्टाहास नाही, अट्टाहास आहे तो समोरचा 'अनुभव'

अचूक आणि जिवंत पकडण्याचा, तो मरगळू न देता तसा पडद्यावर मांडण्याचा. याने त्यांचा हा चित्रपट अतिशय वेधक आणि चटका लावणारा होतो, परंतु दतर्जी यांच्या दिग्दर्शनाची म्हणून काही स्वतंत्र शैली तयार होत नाही. कधी शैलीपुरते ते सत्यजित शैलीचे वाटतात तर कधी ऋत्विक घटक या दुसऱ्या मोठ्या बंगाली दिग्दर्शकाचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्मरण देतात तर केव्हा जुन्या न्यू थिएटर्सच्या कौटुंबिक चित्रपटाच्या शैलीने जातात आणि लगेच युरोपीय अत्याधुनिक चित्रण-तंत्रांचा बेधडक वापर करतात. हे सारे ते पेलतात हातच्या कथावस्तूची सातत्याने उत्तम जाण बाळगून आणि व्यक्त करून.

या कथेतल्या व्यक्तिरेखा श्रेष्ठ अभिनयापेक्षा नेमक्या व्यक्तिमत्त्वाची अपेक्षा असलेल्या होत्या. नायक झालेला नवीन नट राकेश, नायिकेची भूमिका केलेली अनोळखी मधू, नायकाच्या बहिनीची आणि आईची भूमिका अनुक्रमे करणाऱ्या तरला मेहता आणि दिना गांधी या भगिनी, नायकाच्या बहिणीची भूमिका करणारी कुमुद बोले, नायकाच्या दोस्ताच्या भूमिकेतला जलाल आगा, नायकाच्या वडिलांची भूमिका करणारे श्री. हॉबल हे सारे आपापल्या भूमिकात चपखल बसले आहेत. भूमिका साकार करण्यासाठी म्हणून वेगळे कष्ट कोणाला पडताना दिसत नाहीत. बाकी सर्व काही दिग्दर्शकाने या सर्वांचा आणि विविध तंत्रांचा सुयोग्य उपयोग करून घेऊन साधले आहे. के. के. महाजन यांचे छाया चित्रण हे तांत्रिक अंगांपैकी अतिशय महत्त्वाचे तांत्रिक अंग आहे. आग्र्याची त्यांनी केलेली अनेक चित्रणे त्या शहरातल्या दैनंदिन जीवनात प्रेक्षकाला अल्लद नेऊन सोडतात, त्यातून त्या जीवनाच्या खांद्याला खांदा घासत भटकवतात.

शेवटी एक प्रश्न, 'भुवन शोम' चित्रपटाला सर्वोच्च सरकारी बहुमान लाभला आणि या चित्रपटाला तो लाभला नाही त्याची कारणे कोणती असावीत? वशिला, पक्षपाती परीक्षक ही कारणे इथे विचारातून बाद करणे श्रेयस्कर. एक तर सर्वसाधारणत: कोणत्याही स्पर्धेत केवळ एवढ्यामुळे पारितोषिके वा सन्मान प्राप्त होतात या समजाला फारसा आधार नाही. आणखीही कारणे असतात व तीच कलादृष्ट्या विचार करताना महत्त्वाची असतात. 'भुवन शोम'ला मिळालेला बहुमान योग्य नव्हता असे स्वतंत्रपणे म्हणता येणार नाही. दोन चांगले चित्रपट तुलनेत, तुलना करणाऱ्यांच्या आवडी-निवडीनुसार, उजवे डावे होऊ शकतात आणि त्यात काहीच वावगे नसते. या दोन चित्रपटात असे कोणते उजवे डावे घडले असेल? मुख्य गोष्ट म्हणजे 'भुवन शोम'च्या दिग्दर्शनात आणि म्हणून त्या संपूर्ण चित्रपटात एकजीव, सलग अशी तांत्रिक परिपक्व शैली प्रतीत होते. उलट 'सारा आकाश'मध्ये दिग्दर्शक विविध तंत्रे वापरून पहताना आढळतो. कोणतीही एक शैली त्याने निर्माण केलेली वा पत्करलेली नाही. दुसरे, 'भुवन शोम'चा अतिशय महत्त्वाचा असा अखेरचा सुमारे वीसेक मिनिटांचा भाग दिग्दर्शकाने कसून चित्रित

करून पक्का बांधला आहे. त्या चित्रपटाचा त्या आधीचा परिणाम तो वाढवतो. या उलट 'सारा आकाश 'मध्ये अखेरचा नायक-नायिकेचा श्रेष्ठ महत्त्वाचा आणि अतिशय अवघड प्रसंग चित्रित करण्यात, आधीच्या भागाच्या तुलनेने दिग्दर्शक कमी पडला आहे. आधीचा परिणाम हा भाग काहीसा कमी करतो. हा प्रसंग फिल्मी होऊ पहातो. प्रत्यक्ष जगणे पहात असल्याचा तोवरचा आनंद जरा ओसरतो. हा प्रसंग फारसा लांबत नाही, चित्रपटाचा परिणाम तो पूर्णपणे घालवीत नाही, तो संपूनही चित्रपट आपल्याला आवडतच रहातो, हे खरे; पण या अतिशय आव्हानात्मक अशा, चित्रपटातील जीवन-नाट्याचा उत्कर्ष साधणाऱ्या प्रसंगाला आणि पर्यायाने इतक्या सुंदर चित्रपटाला न्याय मिळाला नाही ही रुखरूख रहातेच. एरवी 'भुवन शोम' इतकाच 'सारा आकाश' संस्मरणीय आहे, चित्रपटांवर आणि आयुष्यावर प्रेम करणाऱ्या कोणालाही मनस्वी अभिमान वाटावा असा आहे.

छान चित्रपटाची, छान कलाकृतीची सोपी व्याख्या कोणती ? जी आस्वादताना आपल्याला 'ही घरी घेऊन जावी' असे आसुसून वाटते ती छान कलाकृती.

असा 'सारा आकाश' आहे.

□ □ □

---

## हेसुद्धा आपल्यासारखेच तर !

१९५८–१९६४ या काळातील बर्लिनमधील शीतयुद्धावर आधारलेली 'हॉटेल्स इन द वॉल' ही जेरोम बार या लेखकाची नवी कादंबरी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. बार तसा पुष्कळ वर्षे लिहितो आहे. १९३० साली त्याच्या लघुकथांचा एक संग्रह प्रसिद्ध झाला होता. त्याला प्रस्तावना होती अर्नेस्ट हेमिंग्वेची. हेमिंग्वेनी लिहिलेली ही एकुलती एक प्रस्तावना; म्हणून तिला विशेष मोल आहे. बार आणि हेमिंग्वे यांची अनेक वर्षांची मैत्री होती; आणि अचानक ती तुटली. कशी ?

बार क्युबामध्ये हेमिंग्वे पतिपत्नींना भेटायला गेले होते. त्यांचे वास्तव्यच काही दिवस हेमिंग्वेंकडे होते. एके दिवशी दुपारी मद्यपानाबरोबरच सुखैनैव साहित्यिक चर्चा चालली असता तेथे असलेल्या तिसऱ्या एका सद्गृहस्थाने बारना विचारले, 'आज हयात असलेल्या अमेरिकन लेखकांपैकी सर्वात श्रेष्ठ लेखक कोण वाटतो तुम्हाला ?'

बारने थोडा विचार केला आणि उत्तर दिले, 'विल्यम फॉकनेर.'

बैठकीत एकदम शांतता पसरली. हेमिंग्वे–बार मैत्री तुटली.

(सॅटर्डे रिव्ह्यू : ३० मे १९७० वरून)

---



समीर

## ◻ अनुवादाची कला

चांगला अनुवाद करणे हे स्वतंत्र लेखन करण्यापेक्षाही अधिक कठीण असते. सुप्रसिद्ध भारतीय समाजशास्त्रज्ञ व्हेरियर एल्विन् याच्या एका पुस्तकाचे इंग्लिशमधून फ्रेंच भाषांतर करण्यासाठी भारतात आलेली फ्रेंच भाषांतरकर्ती सौ. मेरी–ॲलिक्स रेव्हेला हिने नुकतेच हे मत प्रकट केले. उदाहरणार्थ, एल्विन्च्या पुस्तकाचे भाषांतर सुरू करण्यापूर्वी तिने एल्विनच्या सर्व साहित्याचा अभ्यास केला. गांधीजींचा एल्विनवर बराच प्रभाव पडला होता म्हणून गांधीजींचे वाङ्मय वाचले, एल्विनच्या जीवनाची शक्य तेवढी माहिती करून घेतली, व त्याचे जेवढे स्नेही भेटू शकले तेवढयांशी बोलणे केले. " याचे कारण मी केवळ 'यांत्रिक' भाषांतर करीत नाही. त्यात स्वारस्य नसते. मी लेखकाचे मन समजून घेण्याचा व त्याच्या मनात शिरण्याचा प्रयत्न करते. शिवाय माझे अनुवाद हे अनुवाद वाटलेले मला आवडत नाही. "

इंग्लिश फ्रेंच भाषांतर विशेषच कठीण असते. " या दोन भाषा अगदी भिन्न आहेत–एक लॅटिन आहे, तर दुसरी सॅक्सन. आणि इंग्लिशमध्ये जे एका शब्दात सांगितले जाते ते फ्रेंचमध्ये स्पष्ट करायचे असेल तर प्रसंगी सबंध वाक्य वापरावे लागते. त्यामुळे भाषांतरकाराला लेखकाची मूळ कल्पना विस्तृत करावी लागते. थोडक्यात म्हणजे इंग्लिशचे फ्रेंच भाषांतर करायचे असेल तर केवळ अनुवाद करण्याच्या ऐवजी बरेच पुनर्लेखन करावे लागते.

## ◻ भारताला प्रशस्तिपत्र

भारताला येणाऱ्या पाश्चिमात्य–विशेषतः अमेरिकन–मंडळींनी येथली एकंदर दुरवस्था पाहून काढलेले उद्गार बहुतेक भारतीयांच्या परिचयाचे असतात. त्यामुळे एखाद्या पाश्चिमात्याने वेगळे–म्हणजे चांगले–मत प्रकट केले तर ते विशेष वाटते. श्री. व सौ. टोबियस वॉट्सन नावाच्या एका अमेरिकन तरुण शिक्षक जोडप्याने नुकतेच भारतभेटीत हे वेगळे मत खालील शब्दात प्रकट केले.

भारताला आल्यावर आमचे भारत-विषयक मत इतके बदलले आहे की भारता-वरील क्रमिक पुस्तके बदलण्याबद्दल आम्ही शाळेच्या अधिकाऱ्यांचे मन वळविणार आहोत. भारतात ' बेसुमार ' लोकसंख्येची गर्दी आहे अशी आमची कल्पना होती ती खरी नाही असे दिसून आले आहे. " कोठेही वैराण जमीन नव्हती. उलट खेड्यातून हिरवीगार शेते दिसली. एक तरी उपाशी भारतीय दिसतो की नाही हे पाहण्यासाठी आम्हाला विशेष प्रयत्न करावे लागले. गारुडी नव्हते तसे महाराजही नव्हते. भारतातली शहरे घाणेरडी असतात असा परदेशात सर्वसाधारण समज आहे. उलट शहरे स्वच्छ दिसली. खरे म्हणजे भारताला ' उदीयमान ' देश म्हणणे चुकीचे आहे, कारण भारताची महानता प्रथमपासून आहे तशीच आहे. " अर्थात् सर्वत्र आबादीआबाद आहे असे नाही. " उदाहरणार्थ, मुंबईच्या फूटपाथवर राहणाऱ्या जनतेचे दृश्य खरोखरीच दयनीय आहे. पण हे जीवन म्हणजे संपूर्ण भारत नाही. " शाळा कशा आहेत ? " येथल्या काही शाळा अमेरिकेतील शाळांच्या जोडीच्या आहेत. पण येथल्या शिक्षण पद्धतीत परीक्षेला अवास्तव महत्त्व आहे. "

## ◻ आजच्या हवाई युगात रेल्वेचे स्थान

सध्याच्या युगात विमान-प्रवासाची झपाट्याने प्रगती होत असताना रेल्वेचे भवितव्य काय ? भारतीय रेल्वेची पाहणी करण्यासाठी नुकतेच भारतात येऊन गेलेले एक ब्रिटिश रेल्वे तज्ज्ञ जॉन रॅटर यांनी या विषयाची चर्चा करताना पुढील मुद्दे मांडले :

निदान युरोपात तरी रेल्वे-वहातुकीच्या योजना तयार करण्याकडे पूर्वीपेक्षाही अधिक लक्ष पुरविण्यात येत आहे. कारण सर्वसाधारण लोकांची अशी भावना आहे की प्रवास फार लांबीचा नसेल तर रेल्वेने जाणे हे अजूनही सर्वात अधिक सोयीचे आहे. बहुतेक सर्व मोठ्या शहरातून मोटार गाड्यांची इतकी गर्दी झाली आहे व गाड्या उभ्या करण्यासाठी एवढी जागा अडविण्यात येते की लोकल आगगाड्यांची सोय अनिवार्य झाली आहे, ' म्हणून मला वाटते की दोन-तीनशे मैलाचा प्रवास करण्यासाठी वेगाने जाणाऱ्या आगगाड्यांना अजून खूप वाव आहे व त्यांना विमानाच्या स्पर्धेची भीती नाही. " विमान खूपच अधिक वेगाने जात असले तरी विमान-तळावर फारच वेळ फुकट जातो.

प्रत्येक देशातल्या रेल्वेपुढे सारख्याच प्रकारच्या समस्या असतात, कारण हे सर्व रेल्वे-मार्ग खूपच वर्षापूर्वी व अगदी निराळ्या परिस्थितीत बांधण्यात आले होते. आणि आता जरी रेल्वेचे तांत्रिक आधुनिकीकरण झाले असले तरी मूलभूत तत्त्वे बदललेली नाहीत. " त्यामुळे वहती विमान-वाहतूक व मोटार-वाहतूक, आधुनिकीकरण व त्याचे परिणाम इत्यादि समस्यांशी मिळते घेण्याचा प्रश्न सर्व देशांतल्या रेल्वेपुढे आहे.

◻ ◻ ◻

साहेब तुमच्या दोस्ताला सांगा
' असा खेळ पुन्हा कुणाशी खेळू नका,
तडफडत रहा आयुष्यभर '

अशोक गोखले

# प श्चा ता प

दारात्री बांगड्यांची किणकिण आली तसा मी भानावर आलो. दाराशी एक तरुणी अवघडून उभी होती. तिचा बांधा सुडौल आणि घाटदार होता. ती गोरी नसली तरी काळीही नव्हती. ती देखणी नसली तरी तरतरीत होती. मी तिच्याकडे पहातो आहे असं तिच्या लक्षात आलं आणि ती परत थोडी अवघडली.

" देसपांड्यांचं हेच घर हाय ना ?" तिनं सवाल केला तसा मी गोंधळलो. ही बाई प्रभाकरचं नाव कशाला घेते आहे तेच कळेना. प्रभाकरचं ह्या ' अशा बाईशी ' काय काम ?

" पन कोन्ते देसपांडे पायजे तुमास्नी. " मी पण ग्रामोणमधेच तिला सवाल केला.

" त्यो फोटोतला देसपांडे...त्योच पायजे या खोलीतच गेल्या सालाला आलो होतो म्या..." तिनं वाटेल ते बोलायला सुरुवात केली.

" ते देशपांडे सध्या येथे नाहीत. दोन महिने सुट्टीवर गेले आहेत. तुम्ही असं करा...काही काम असेल तर मला सांगा " मी आपला सहजच बोललो.



"सायेब आमाला पन मन हाय...हाय का नाय. पन दगा देनाराची आमी गचांडी धराया कमी नाय करायचो." ती आवाज चढवून बोलायला लागली तसे मी तिला म्हटले, "तुम्हाला काय जे सांगायचे असेल ते नंतर सांगा. तुम्ही तुमचा पत्ता देऊन ठेवा मी येईन तिथं."

"संध्याकाळ चढू लागली तशी माझी अस्वस्थता वाढू लागली. उगीचच येईन असं आश्वासन दिले. ते पाळले तर तमाशाला जाणारा प्रोफेसर म्हणून गावात बद-

नामी आणि न गेलो तर उद्या ती ब्याद घरापाशीच तमाशा करायची.

. लॉजवर रात्रीचं जेवण झालं तेव्हा तेथल्या शामरावला तमाशा कुठे उतरलाय ते विचारलं. त्यानं तळ्याचा पत्ता सांगितला. वर म्हणाला, " पन सर, तुम्ही कायले पडता झनझटीत...मागल्या वर्साला देसपांडे सायब पागल झाले व्हते...' पुढचं काही ऐकायच्या आत मी लॉजच्या बाहेर पडलो. तमाशाला जायचं न जायचे याच्या पेचात मी सापडलो होतो. प्रभाकरनं माझ्यापुढं चांगलाच पेच निर्माण केला होता प्रभाकर मागल्यावर्षी तमाशाला रोज जायचा हे माझ्या कानावर आलं होतं, पण तो आपला गमतीखातर जात असेल असं वाटलं प्रभाकर तहसिलीत बाबू. आमच्याच गावचा. मी कॉलेजमध्यें प्राध्यापक म्हणून रुजू झालो तेव्हापासून त्याच्या खोलीवर पार्टनर म्हणून रहातोय. तरुण मनं एकत्र आली की बोलकी होतात आणि मग ती हलकी होतात. पण आमची दोघांची मनं कधीच हलकी झाली नाही. प्रभाकर आपल्याच तंद्रीत असायचा. कदाचित् माझ्याजवळ काही गोष्टींचा उल्लेख करणे त्याला आवडत नसावे किंवा तो मला घाबरत असावा. पण तो माझ्यासमोर चांगला वागत असे.

साडेनवाचा टोला झाला तसा भानावर आलो. पायात सपाता सरकवल्या. दारला कडी लावून कुलूप लावले आणि पावलं तळ्याकडे वळवली. अशी पावलं पडू नये असं वाटत होतं पण प्रभाकरसाठी ती वाकडी पडायला पाहिजे होती. हवेत गारठा होता. त्या वाईट वस्तीत तो तमाशाचा तंबू उभा होता. मी निरीक्षण करू लागलो आडोशाला उभे राहून. टयूब लाईटच्या प्रकाशात तंबू उजळ माथ्यान आपलं दारिद्रय उघडं टाकत होता. सकाळी आलेल्या बाईला आता भेटायचं कसं हा प्रश्न उभा राहिला. बाकीच्या लोकांप्रमाणे मी तिकीट काढलं आणि तंबूमध्ये टाकलेल्या फाटक्या सतरंजीवर फतकल मारून बसलो. आजूबाजूला मला न ओळखणारी तेलकट मळकट माणसे बसली होती.

थोडया वेळानं तमाशा सुरू झाला. सकाळी घरी आलेली तरुणी नाचणाऱ्यांमधे होती. ती इतरांपेक्षा सरस होती. रूपानं आणि गुणानंही. तिनं दोन तीन गिरक्या घतल्या आणि तिचं लक्ष माझ्याकडे गेलं तशी ती थोडी थांबली आणि लगबगीनं आत गेली. ती गेली म्हणून माझ्या बाजूचा हळहळला, " परभी गेली रांडेची आतमंदो."

मी त्याच्याकडे पाहिलं तसा त्यानं डोळा मिचकावला. आणि 'क्यो किधर रस्ता भूल गये' अशा अर्थानं खूण केली. काही का असेना तिचं नाव मला कळलं होतं. प्रभी...प्रभा.. प्रभी बरोबरच्या नाचणाऱ्या जमलेल्यांचं मनोरंजन करीत होत्या.

थोडया वेळानं समोरच्या दोन तीन रांगांना तुडवून एक धिप्पाड माणूस माझ्याजवळ आला. " सायब, प्रभी बोलावतेया तुमास्नी...अंदर चला. " एखाद्या पोलीसानं एखाद्या अट्टल गुन्हेगाराला अंदर चलो म्हटल्यावर त्यानं सराईताप्रमाणे आत जावं तसा मी आत जायला उठलो. 'मजा है भाई' परत तो माझ्या शेजारचा

कुजबुजला मी त्याच्याकडे लक्ष न देता त्या घटिंगणासोबत आत गेलो. आल्या बाजूनं आम्ही तंबूच्या बाहेर आलो बाहेर दोन तीन राहुट्या दिसत होत्या. त्यातल्या एका राहुटीकड बोट दाखवून तो घटिंगण रेकलेल्या स्वरात म्हणाला, " तिथं जावा पावनं."

आता गटारात पडल्यावर कसली लाज बाळगायची ? येईल त्या प्रसंगांना तोंड देणं आवश्यकच होतं त्यानं दाखवलेल्या राहुटीत मी शिरलो. तशी प्रभी उठून उभी राहिली. तिनं मला बसायला खुर्ची दिली आणि स्वत: अवघडून खाली बसली. नाचगाण्यासाठी केलेला मेकअप अद्याप चेहऱ्यावर होताच. तिचा चेहरा फारच मलूल वाटत होता. त्या तेवढ्याशा राहुटीत एका झोळीत एक पोर देखिल झोपलं होतं.

" मला वाटलं नव्हतं तुम्ही याल ... पण आलात. फार बरं वाटलं." तिचं हे शुद्ध बोलणं ऐकून मला आश्चर्य वाटलं. मघाशी सकाळी ग्रामीण भाषेत आनी-पानी करणारी ही शुद्धपणे बोलतांना मी पहात होतो. " काय आश्चर्य वाटल ना माझं बोलणं ऐकून ? " माझ्या चेहऱ्याकडे पहात तिनं मला विचारलं. परत ती खिन्न हसली. म्हणाली ... " अशी पळून आले नसते तर तुमच्या सारख्याची बायको म्हणून घरात वावरले असते. पण आज तुमच्या घरी आले तेव्हा तमाशा नको म्हणून तुम्ही मला असे रात्री भेटायला आलेत. तुम्ही रात्री करायची ती पापं आम्ही दिवसाढवळ्या अंगावर मिरवायची ... लोकांची छी थू ऐकायची... त्याच्याचसाठी आमचा जन्म." ... परत ती स्फुंदू लागली. मग थोडी सावरून बसली ... " माफ करा साहेब. मी भावनेच्या भरात वाटेल ते बोलले ... साहेब



मी ब्राह्मणाची पोरगी ... वयाच्या दहाव्या वर्षी घर सोडलं ... नाच गाण्यानं चटक लागली. कळत नव्हतं. पण पैसा मिळायला लागला नाचण्याचा, गाण्याचा. बाजारात, रस्त्यावर, हॉटेलसमोर. तो मघाचा धटिंगण पाहिला ना तो शंकरकाका. मला घेऊन गावोगाव हिंडला. मला त्यानं मुलीप्रमाणं वागवलं. मग पुढे या नाचण्याचा उबग आला. कारण उघडउघड किंमत लावली जाऊ लागली. शंकरकाकाला मी तसं स्पष्ट सांगितलं. तो म्हणाला, 'पोरी तुझ्यामुळं मला पैसा मिळतो. पुढं हमाली करूनशान पैसा मिळल.' त्यानं मग मला माझ्या गावी आणलं. घरी गेले तेव्हा कळलं की आईवडील वारले. खूप वाईट वाटलं. शंकरकाकाच्या खांद्यावर डोकं ठेवून खूप रडले. नंतर नागपूरच्या एकुलत्या एका भावाकडे ... सुरेश महाजन त्याचं नाव. मोठा झाला आहे आता. त्यानं दारातही उभं ठेवलं नाही. मला सुधारण्याचा मोकाही मिळाला नाही. भविष्य हातात घेऊन मग शंकरकाकाबरोबर तमाशाच्या निमित्तानं गावोगाव भटकू लागलो. मन रमत नव्हतं तरी मन मारून दुसऱ्याच्या मनोरंजनासाठी हे शरीर थकेपर्यंत असंच नाचत राहिलं. मागल्या वर्षी प्रभाकर देशपांड्यांनी असचं नाचवलं मला. काय मिठ्ठास बोलायचा. त्याच्या त्या गोड बोलण्यानं मला पण खूप बरं वाटायचं. तहसिल ऑफिसमध्ये चलान वगैरे भरण्यापासून सर्व त्यानंच केलं. तळ्यामध्ये तंबू ठोकायची परवानगी त्यानंच मिळविली. येथे तमाशाचे शोकीन लोक. रोज गर्दी व्हायची. कमाई चांगली व्हायची. तमाशा रात्री बेरात्री संपायचा. मग चहा वगैरे व्हायचा. प्रभाकर त्याला देखील हजर असायचा. मागल्या वर्षीच्या मुक्कामाला ... " तिला उचकी लागली तसं ती लोट्यातलं पाणी घटाघट प्यायली. झोळीला झोका दिला ... " दुपारी जेवायलासुद्धा प्रभाकर यायचे कधीकधी. एक दिवस असंच मला म्हणाले, 'प्रभी, चल माझ्या खोलीवर. तिथं आपण मोकळेपणाने बोलू.' रात्र खूप झाली होती, पण प्रभाकरचा विश्वास वाटत होता. रात्री केव्हातरी आम्ही खोलीवर पोचलो. खोली बंद करून मग त्यानं माझ्याशी लग्न करण्याच्या गोष्टी सुरू केल्या. त्याचं माझ्यावर खूप प्रेम आहे म्हणायला लागला. मीही भाळले. आणि या पोराच्या गळ्याची शप्पत "... म्हणून तिनं त्या झोळीतल्या पोराच्या कंठाला हात लावला. तसं ते जागं झालं. थोडं किंचाळलं आणि मग किंचाळतच राहिलं. त्या किंचाळण्यातच मग ती पुढं म्हणाली, " आणि साहेब, पहिल्यांदा आणि शेवटच्यांदा मी आपलं शरीर ... " त्या मुलाच्या केकाटण्यातच माझ्या हृदयाचा एक ठोका चुकला. हातातल्या जळत्या सिगारेटचा चटका बसून मी भानावर आलो.


प्रभी मुलाला छातीशी धरून पाजत होती त्यामुळं ते पोर शांत झालं होतं. मातृत्वानं तृप्त झालेलं तिचं शरीर त्या पोराला अमृत पाजत होतं. सारा जीवनपट तिनं माझ्यापुढं उभा केला होता. मला बोलण्यासारखं तिनं काहीच ठेवलं नव्हतं.

"साहेब, माझं एवढं ऐकून घेतलं त्याबद्दल मी फार आभारी आहे. मला हलकं हलकं वाटलं बघा. पण तुमच्या दोस्ताला सांगा म्हणे, "असा खेळ पुन्हा कुणाशी खेळू नका. तडफडत रहा म्हणे आयुष्यभर." ती स्फुंदून स्फुंदून सांगू लागली.

मी घरी परतलो तेव्हा रात्री कुठे दोनचे ठोके पडले होते. दुसऱ्या दिवसाची प्रिपरेशन करायची होती म्हणून जागत होतो. पण नजरेसमोर प्रभा महाजनचा करुण चित्रपट येत होता.

आज इतक्या वर्षांनी या गोष्टीची आठवण झाली. कारण प्रभाकर देशपांडेची नि माझी सतरा वर्षांनी भेट होत आहे. मी कॉलेजचा सीनीअर प्रोफेसर आहे आणि प्रभाकर तहसिलदार आहे. मला चार मुलं आहेत. माझी मोठी मुलगी पुढल्या वर्षी मॅट्रिक होईल. पण प्रभाकरला अद्याप मूल नाही. परवा भेटला तेव्हा त्याला ती खंत खात असलेली दिसली. परवा मग आम्ही खूप दूर हिंडायला गेलो. दूर गेल्यावर एका ओटयावर जाऊन बसलो. बसता बसताच मी म्हटलं, "प्रभा महाजन लक्षात आहे प्रभाकर?" माझ्या या प्रश्नानं प्रभाकर कावराबावरा झाला. काय बोलावं तेच त्याला समजेना. प्रभाचे माझ्याकडे येणे आणि ते कथानक मी त्याच्यासमोर उभे केले. क्षणाक्षणाला तो अस्वस्थ होत होता. शेवटी प्रभाकर हळवा होऊन रडू लागला. म्हणू लागला, "तात्या, मी चुकलो. मी माझ्या कर्माची फळं भोगतो आहे. मी यातच मरणार. जीवनात केलेल्या एका चुकीनं माझ्या आयुष्याला विरजण लागलं. पण या दुःखाला दोन वाटा नाहीत, ते प्रभाला जितकं होतं तितकंच मला पण होतं आहे. मी अपराधी आहे. तात्या, मी नराधम आहे. मला मेलं तरच मुक्ती मिळल. मी जगण्यायोग्य नाही." कपाळावर बुक्क्या मारून प्रभाकर रडू लागला.

मी त्याला सावरलं. आम्ही घरी परत आलो. प्रभी व प्रभाकरचे दुहेरी दुःख समांतर नव्हतं. ते नियतीला मान्य नव्हतं. ते प्रत्येकाने वेगवेगळं भोगायचं असेल कदाचित ... नियतीच्या मनात.






लेखांक : सतरा

चेंबर्लेनचे ते पत्र वाचताच हिटलर कमालीचा भडकला. एखाद्या चवताळ-लेल्या वन्यप्राण्याप्रमाणे त्याचे डोळे आग ओकू लागले. काय करू अन् काय नको

असे त्याला झाले होते. चेंबर्लेनचे पत्र घेऊन आलेल्या सर होरेस विल्सनची अवस्था भेदरलेल्या कोकरासारखी झाली होती.

सुडेटनलँडबाबत जर्मनीने चेकोस्लोव्हाकियाशी वाटाघाटी केल्या पाहिजेत हे सुचविण्याचे धाडस चेंबर्लेनने करावे हे पाहून हिटलरचा तोल सुटला होता. 'फ्यूरर एवढा संतापल्याचे मी पूर्वी कधीही पाहिले नव्हते' असे त्याच्या परिवारातील डॉ. श्मिड्ट याने म्हटले आहे. नेहमीप्रमाणे टेबलावर मूठ आपटत हिटलर ओरडत होता, "तुम्ही आम्हाला भिकारी समजता की काय! जे आमच्या हक्काच आहे त्यासाठी वाटाघाटी करण्याचं कारणचं काय? आणि त्या वाटाघाटी कोणाबरोबर – चेकोस्लोव्हाकियाबरोबर? अशक्य! मी एक आक्टोबरला चेकोस्लोव्हाकिया ताब्यात घेणार आहे. मग त्यापायी ब्रिटन आणि फ्रान्स यांनी कितीही आदळआपट केली तरी मला त्याची पर्वा नाही. मी त्यांना कवडीचीही किंमत देत नाही. समजलं!"

सर होरेस विलसन निमूटपणाने लंडनला परतला.

थोड्या वेळाने हिटलर भानावर आला. तो जसा हेकेखोर होता तसाच चाणाक्षही होता. आततायीपणाने वागण्याची ही वेळ नव्हे हे त्याने जाणले. सुडेटनलँड ताब्यात येईपर्यंत चेंबर्लेनला चुचकारणे आवश्यक होते. लागलीच त्याने चेंबर्लेनला पत्र लिहिले–'सुडेटनलँड ताब्यात आल्यानंतर जर्मनीकडून चेकोस्लोव्हाकियाच्या सीमेचा भंग होणार नाही असे आश्वासन द्यायला मी तयार आहे. त्यामुळे, गोडेसबर्ग येथल्या भेटीत जी योजना मी तुमच्यापुढे मांडली ती मान्य करण्यात चेकोस्लोव्हाकियाचेच हित आहे हे तुम्ही बेनेस याला पटवून द्यावे असे मला वाटते.'

सत्तावीस सप्टेंबरला रात्री साडेदहा वाजता हिटलरचे हे पत्र चेंबर्लेनच्या हातात पडले. ते वाचताच त्याचे उसने अवसान गळाले.

हिटलरची युक्ती सफल झाली होती.

हिटलरच्या पत्राला चेंबर्लेनने उत्तर धाडले–"तुम्हाला जे काही हवे आहे ते युद्ध न करताही मिळण्यासारखे आहे. सुडेटनलँड जर्मनीमध्ये समाविष्ट करण्याच्या कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी चेक नेत्यांना बर्लिनला बोलावण्यात यावे. मीही येतो. तुमची इच्छा असल्यास दलादिए आणि मुसोलिनी यांनाही बोलावून घ्यावे. म्हणजे सर्वांचा विचारविनिमय होऊन शांततेने हा प्रश्न सुटू शकेल. हे सारे घडून यायला एक आठवड्यापेक्षा अधिक वेळ लागणार नाही. म्हणून तुम्ही तूर्त तरी लष्करी उपाययोजनेचा विचार करू नये."

हिटलरला धाडलेल्या पत्राची प्रत चेंबर्लेनने मुसोलिनीकडेही धाडून दिली. हिटलर कदाचित आपले ऐकणार नाही, पण मुसोलिनीसारख्या मित्राचे म्हणणे नक्कीच मान्य करील या विचाराने आगामी वाटाघाटींच्या वेळी मुसोलिनीला

आमंत्रण द्यायचे असे चेंबर्लेनने ठरविले. म्हणूनच चेंबर्लेनने मुसोलिनीला पत्र लिहिले–"सुडेटनलँडचा प्रश्न वाटाघाटी करूनच सोडविला पाहिजे असे तुम्ही हिटलरला आवाहन करावे. तुमचे म्हणणे तो नक्कीच ऐकेल." चेंबर्लेनचे हे पत्र हाती पडताच मुसोलिनीने बर्लिनमधल्या आपला राजदूत बर्नार्डो अटोलिको याला फोन केला–"सुडेटनलँडबाबत लष्करी कारवाई करण्याची गरज राहणार नाही हा माझा निरोप तू 'फ्युरर'ला जाऊन सांग."

हिटलरने चेकोस्लोव्हाकियाला दिलेल्या अंतिमोत्तराची मुदत अठ्ठावीस सप्टेंबरला दुपारी दोन वाजता संपत होती. ती मुदत टळून गेल्यानंतर हिटलर काय करतो याकडे साऱ्या युरोपचे लक्ष खिळले होते. परंतु दोन वाजायला काही मिनिटे कमी असतानाच अटोलिको याच्यामार्फत मुसोलिनीचा निरोप हिटलरला कळला होता. त्यामुळे लागलीच जर्मन परराष्ट्रमंत्री रिबेन्ट्रॉप याने जाहीर केले–"चेकोस्लोव्हाकियासंबंधी विचार करण्यासाठी उद्या दुपारी म्युनिक येथे ब्रिटन, फ्रान्स आणि इटली यांचे सरकारप्रमुख 'फ्युरर'ला भेटणार आहेत."

रिबेन्ट्रॉपचे हे निवेदन ऐकताच चेक राष्ट्राध्यक्ष बेनेस याने चेंबर्लेनला तार केली–"आमची बाजू ऐकून घेतल्याशिवाय म्युनिक येथे सुडेटनलँडबाबत कोणताही निर्णय केला जाऊ नये अशी आमची अपेक्षा आहे."

वस्तुतः, म्युनिक-बैठकीमध्ये चेक प्रतिनिधीला बोलावण्यात आले पाहिजे असा चेंबर्लेनने आग्रह धरायला हवा होता. परंतु हिटलरला नाराज करायला तो तयार नव्हता. त्यामुळे त्याने बेनेस याला कळविले–'चेकोस्लोव्हाकियाच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याचा मी अवश्य प्रयत्न करीन.'

एकोणतीस सप्टेंबरला सकाळीच हिटलर खास आगगाडीतून बर्लिनहून म्युनिकला येऊन पोचला होता. तेथून तो मुसोलिनीच्या स्वागतासाठी कुफस्टेन येथे गेला. चेंबर्लेन आणि दलादिए यांच्याशी बोलताना आपण दोघांनी कोणती भूमिका घ्यायची यासंबंधी कुफस्टेन-म्युनिक प्रवासात हिटलर आणि मुसोलिनी यांचे बोलणे झाले. हिटलरने आपल्याबरोबर नकाशेही आणले होते. ते दाखवीत तो एकसारखा मुसोलिनीला म्हणत होता–"चेकोस्लोव्हाकिया नष्ट करण्याच्या माझ्या निर्धारात मुळीच बदल होणार नाही. माझे हे उद्दिष्ट आजच्या बैठकीत सफल झालं तर ठीकच, नाहीतर मला चेकोस्लोव्हाकियाविरुद्ध युद्धाला उभं राहिलंच पाहिजे. त्याचप्रमाणे आज ना उद्या आपल्याला इंग्लंड आणि फ्रान्स यांच्याविरुद्ध लढावं लागणार आहे हे विसरून चालणार नाही."

मुसोलिनीने मान डोलवून हिटलरच्या बेताला होकार दिला.

दुपारी पाऊण वाजता म्युनिक येथे हिटलर, चेंबर्लेन, मुसोलिनी आणि दलादिए या चार राष्ट्रप्रमुखांच्या बैठकीला प्रारंभ झाला. ज्या चेकोस्लोव्हाकियासंबंधी या बैठकीत विचारविनिमय होणार होता त्याच्या प्रतिनिधीला बोलावण्याची कोणालाही गरज वाटली नाही.

मुसोलिनीने चर्चेला प्रारंभ केला. गोडेसबर्ग येथे आपल्याशी बोलताना हिटलरने जी मागणी केली होती तिचाच मुसोलिनीने आपल्या भाषणात पुनरुच्चार केल्याचे पाहून चेंबर्लेनला आश्चर्य वाटले. जर्मन परराष्ट्रखात्याने तयार केलेला मसुदाच मुसोलिनी वाचून दाखवीत आहे याची बिचाऱ्या चेंबर्लेनला कोठून कल्पना असणार !

त्यामुळे त्याने भाबडेपणाने विचारले, " सुडेटनलँडमधली जी सरकारी मालमत्ता जर्मनीच्या ताब्यात येणार आहे तिच्याबद्दल जर्मनीकडून चेकोस्लोव्हाकियाला नुकसान भरपाई दिली जाणार आहे ना ? त्याचप्रमाणे सुडेटनलँडमधून बाहेर पडणाऱ्या चेक शेतकऱ्यांनी आपली गुरंढोरं आपल्याबरोबर नेता कामा नयेत असं मुसोलिनीनं म्हटलं आहे त्याचा अर्थ चेक शेतकऱ्यांनी केवळ अंगावरच्या कपड्यानिशी सुडेटनलँडमधून निघून जावं असाच होतो ना ?"

चेंबर्लेनने असले प्रश्न विचारावेत ही गोष्ट हिटलरला मुळीच आवडली नाही. आपण जे म्हणतो आहे त्याला चेंबर्लेनने मुकाट्याने मान्यता द्यावी अशीच त्याची अपेक्षा होती. त्यामुळे हिटलर म्हणाला, " हे बघा, इतक्या क्षुल्लक गोष्टीवर वादविवाद व्हावा असं मला वाटत नाही. ही बैठक यशस्वी व्हावी अशी जर तुमची इच्छा असेल तर कोणीही जर्मनीच्या हेतूबद्दल शंका घेता कामा नये."

चेंबर्लेन गप्प बसला.

पुन्हा मुसोलिनीचे प्रवचन सुरू झाले. तो म्हणाला, " चेक नागरिकांनी सुडेटनलँडमधून बाहेर पडायला एक ऑक्टोबरपासून प्रारंभ करावा आणि दहा ऑक्टोबरपर्यंत हे कार्य पूर्ण व्हावं."

दलादिएने विचारले, " तुमच्या दृष्टीनं हे सारं ठीक आहे. परंतु याबाबत चेक सरकारला विचारायला नको का ? म्हणून म्हणतो की आपण चेक सरकारच्या प्रतिनिधींना इथं बोलावून घ्यावं."

पुन्हा हिटलरचा आवाज चढला—" चेक सरकारच्या संमतीची मला पर्वा नाही. त्याचप्रमाणे या बैठकीत चेक सरकारच्या प्रतिनिधींचं अस्तित्वही मला सहन होणार नाही.

दलादिएही गप्प बसला.

चेंबर्लेन म्हणाला, " चेक प्रतिनिधींना आपण या बैठकीमध्ये सामील करून घेऊ नये हे म्हणणं मला मान्य आहे. पण निदान त्यांच्याशी विचारविनिमय तरी करायला नको काय ! त्याशिवाय आपण इथं जे काही ठरवू त्याला काहीच अर्थ उरणार नाही."

या बाबतीत उगाच ताणण्यात अर्थ नाही हे हिटलरने ओळखले. तो म्हणाला, " ब्रिटिश प्रधानमंत्र्यांची सूचना मला मंजूर आहे. चेक प्रतिनिधींना ताबडतोब बोलावून घ्या आणि त्यांना शेजारच्या खोलीत बसवा."

त्याप्रमाणे बर्लिनला फोन करण्यात आला आणि मास्त्नी आणि मस्तारिक हे दोघेजण म्युनिकला येऊन दाखल झाले. चौघा राष्ट्रप्रमुखांच्या बैठकीमध्ये दिवसभरात काय ठरले हे सर होरेस विल्सन याने मास्त्नी आणि मसारिक यांना समजावून सांगितले. कोणकोणत्या प्रदेशातून चेक अधिकाऱ्यांनी आणि नागरिकांनी तात्काळ बाहेर पडले पाहिजे हे हिटलरने तयार केलेल्या नकाशाच्या आधारे विल्सन विशद करू लागला तेव्हा ते दोघेजण म्हणाले, " हे आम्हाला मान्य नाही. सुडेटनलँडची सीमा बरीच पुढं आलेली दिसतेय."

"जे काही ठरलं आहे ते मी तुम्हाला सांगितलं," असे तुटक उत्तर देऊन विल्सन तेथून बाहेर पडला. ॲश्टन ग्वाटकिन हा ब्रिटिश अधिकारी तेथे उभा होता. तो मास्त्नी आणि मसारिक यांना म्हणाला, " तुम्हाला जर या अटी मान्य नसतील तर मग चेकोस्लोव्हाकिया आणि जर्मनी यांनी पाहून घ्यावं. आम्हाला यापेक्षा अधिक काहीही करता येणार नाही."

गप्प बसण्याशिवाय मास्त्नी आणि मसारिक यांना यावेळी काहीही करता येण्यासारखे नव्हते.

दुपारी पाऊण वाजता सुरू झालेली चौघा राष्ट्रप्रमुखांची बैठक बरोबर बारा तास चालली होती. इतकी प्रदीर्घ चर्चा होऊनही हिटलरच्या मूळ योजनेमध्ये कोणताच बदल झालेला नव्हता. चेंबर्लेन आणि दलादिए यांचा प्रत्येक आक्षेप हिटलरने आदळआपट करून धुडकावून लावला होता आणि बैठक मोडायला नको या इच्छेपायी चेंबर्लेन आणि दलादिए प्रत्येक वेळी गप्प बसले होते.

ब्रिटन आणि फ्रान्स या युरोपमधल्या दोन प्रमुख लोकसत्ताक राष्ट्रांचा दुबळेपणा पुन्हा एकदा उघडा पडला.

रात्री एक वाजता म्युनिक-करारावर हिटलर, मुसोलिनी, चेंबर्लेन आणि दलादिए यांच्या स्वाक्षऱ्या झाल्या. एक ऑक्टोबरपासून जर्मन लष्कराने सुडेटनलँडचा ताबा घ्यायला प्रारंभ करावा आणि दहा ऑक्टोबरपर्यंत संपूर्ण सुडेटनलँड जर्मनीत समाविष्ट व्हावे असे या करारात म्हटले होते.

गोडेसबर्ग येथे चेंबर्लेनने जे नाकारले होते ते हिटलरने म्युनिक येथे पदरात पाडून घेतले होते – मुसोलिनी आणि दलादिए यांच्या साक्षीने.

बैठक संपली होती. या बैठकीतील निर्णय बाहेर ताटकळत उभ्या असलेल्या चेक प्रतिनिधींना सांगण्याची जबाबदारी हिटलरने चेंबर्लेन आणि दलादिए यांच्यावर सोपविली. आपल्या मित्रांनीच आपल्याला दगा दिलेला आहे हे चेकोस्लोव्हाकियाला कळावे यासाठीच हिटलरने हा 'मान' ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या प्रधानमंत्र्यांना दिला होता. त्याप्रमाणे हिटलर आणि मुसोलिनी निघून गेल्यानंतर चेंबर्लेन आणि दलादिए यांनी मास्त्नी-मसारिक यांना बोलावून घेतले. कराराचा

तपशील सांगताना चेंबर्लेन आणि दलादिए यांचे चेहरे उतरले होते. मास्त्नी आणि मसारिक यांची समजूत घालताना त्या दोन्ही प्रधानमंत्र्यांना अवघडल्यासारखे झाले होते.

मसारिक म्हणाला, "आणखी चोवीस तासांनी या कराराच्या अंमलबजावणीला प्रारंभ होणार आहे. त्यापूर्वी या कराराबाबत आमच्या सरकारचं मत विचारणार आहात की नाहीत? का साराच एकतर्फी खेळ आहे?"

आपल्या प्रधानमंत्र्यावर नको ते उत्तर द्यायची पाळी येऊ नये म्हणून फ्रेंच परराष्ट्र सचिव लेगेर उत्तरला, "तेवढा आता वेळही नाही आणि तशी गरजही नाही चेक सरकारला हा करार मान्य आहे असं गृहित धरूनच त्यावर स्वाक्षऱ्या करण्यात आलेल्या आहेत."

आपल्या देशाला आता कोणत्या मानहानीला तोंड द्यावे लागणार आहे हे मास्त्नी आणि मसारिक यांना कळून चुकले. खाली माना घालून ते तेथून बाहेर पडले.

बैठक आटोपून रेजिना पॅलेस हॉटेलमध्ये परतताच चेंबर्लेनने प्रागमधल्या आपल्या राजदूताला तार केली – "तू ताबडतोब बेनेसची भेट घेऊन म्युनिक-करार मान्य करणे चेकोस्लोव्हाकियाच्या हिताचे कसे आहे हे त्याला समजावून सांग. चर्चा करण्याइतका अवधी राहिलेला नाही. त्यामुळे 'आम्हाला हा करार मंजूर आहे' अशी चेकोस्लोव्हाकियाने तात्काळ घोषणा केली पाहिजे."

दलादिए यानेही प्रागमधल्या आपल्या राजदूताला अशाच आशयाची तार केली.

दलादिए ज्या हॉटेलमध्ये उतरला होता तेथे, या महत्त्वपूर्ण बैठकीच्या निमित्ताने, म्युनिकमध्ये आलेले फ्रेंच वार्ताहर त्याची वाट पहात उभे होते. त्यांच्याशी बोलताना दलादिए म्हणाला, "तीस लाख सुडेनट जर्मनांचा हट्ट पुरवायचं नाकारून दीड कोटी युरोपीय नागरिकांची हत्या होऊ देणं शहाणपणाचं ठरलं नसतं म्हणून मी या करारावर स्वाक्षरी केली."

पण हे खरे नव्हते.

दलादिएचे मन त्याला खात होते. आपल्या शब्दावर ज्याने पूर्ण भरवसा ठेवला अशा मित्राशी आपण दगलबाजी केली आहे असे त्याचे मन टाहो फोडून त्याला सांगत होते. परंतु युद्धाच्या भीतीपायी त्याने आपल्या मनाच्या आक्रोशाकडे लक्ष दिले नाही. तशी नंतर त्याने एका लेखात कबूलीही दिलेली आहे.

म्युनिक-करारासारख्या अपमानास्पद तरतुदीवर आपण स्वाक्षरी केली ही गोष्ट आपल्या देशबांधवांना आवडलेली नसणार. ते आपल्यावर रुष्ट झालेले असतील अशी म्युनिकहून पॅरिसला जाताना दलादिएला सारखी भीती वाटत होती. दलादिएचे विमान ले बोर्जे विमानतळापाशी आले तेव्हा खालचा जनसागर पाहून तर दलादिएच्या उरात धडकीच भरली. तो वैमानिकास म्हणाला, "विमानतळावर जमलेल्या लोकांची समजूत कशी घालायची याचा विचार करायला मला थोडा


थांबा!
ताकद वापरून उपयोग नाही.
यासाठी हवी उत्तम शाई. कॅमल डीलक्स इंक भरा.
मग पहा पेन कसं सुरेख सफाईने चालतं ते.
कॅमल डीलक्स इंक खरेदी करा
camel
deluxe ink
ROYAL BLUE

अवधी हवा आहे. म्हणून तू विमान मी सांगेपर्यंत खाली उतरवू नकोस."

बावरलेल्या चेहेऱ्यानेच दलादिए विमानातून बाहेर पडला. आता लोकांपुढे काय बोलायचे याची मनातल्या मनात तो सारखी उजळणी करीत होता. लोकक्षोभ अनावर झाला तर काय करायचे या विचाराने तो अस्वस्थ झाला होता — पण घडले ते वेगळेच.

लोक त्याचा जयजयकार करीत होते.

क्षणभर त्याला असेही वाटले की आपण ऐकतो आहोत ते खरे आहे ना — की भास आहे ? तो भास नव्हता. हिटलरबरोबरचे युद्ध टाळल्याबद्दल फ्रेंच जनता आपल्या प्रधानमंत्र्यावर बेहद्द खूष झालेली होती. पांच लाख लोक विमानतळा-पासून प्रधानमंत्र्याच्या निवासस्थानापर्यंत त्याचे स्वागत करण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला दाटीवाटीने उभे होते.

विमानतळावरचा तो जयजयकार ऐकला आणि दलादिएच्या मनावरचे दडपण एकदम दूर झाले. विमानतळावर जमलेल्या लोकांना उद्देशून तो म्हणाला, "युरोप-मधील शांतता टिकविण्यासाठी म्युनिक-करारासारख्या तडजोडी कराव्या लागतात. देवाणघेवाण आणि सामंजस्य हा तर आंतरराष्ट्रीय राजकारणाचा पाया असतो अन् म्हणूनच आम्ही हा करार केलेला आहे."

पॅरिस आनंदात मश्गुल होते आणि प्राग — ?

विटंबनेचे दशावतार पाहण्याची पाळी आलेल्या प्रागने एकच आकांत मांडला होता. ब्रिटन आणि फ्रान्स या दोन बड्या राष्ट्रांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी चेकोस्लोव्हाकियाच्या स्वातंत्र्याचा सौदा केला असेच प्रत्येक चेक नागरिक संतापून म्हणत होता. त्यामुळे म्युनिक-करार चेकोस्लोव्हाकियाच्या हिताचा कसा आहे हे सांगण्यासाठी फ्रेंच आणि ब्रिटिश राजदूत चेक परराष्ट्रमंत्री डॉ. क्रोफ्टा याला सांगायला गेले तेव्हा तो म्हणाला, "पोकळ शब्दांनी कधी कुणाचं सांत्वन होत नसतं. आमच्या दृष्टीनं सारं काही संपलेलं आहे. ठीक आहे. आज चेकोस्लोव्हा-कियाच्या स्वातंत्र्याचा लिलाव पुकारला जात आहे; पण एवढ्यावर हे थांबणार नाही. इतरांवरही हेच संकट कोसळणार आहे."

ब्रिटिश आणि फ्रेंच राजदूत निघून गेल्यानंतर डॉ. क्रोफ्टा मंत्रिमंडळाच्या बैठकी-साठी बेनेस यांच्या निवासस्थानी गेला. सारेच जण हतबुद्ध झाले होते. नाझी लष्करशाहीच्या उद्दाम गर्जना आणि अँग्लो-फ्रेंच नेतृत्वाचा नादान नेभळटपणा या कात्रीत सापडलेल्या चेकोस्लोव्हाकियाला आपला संताप मुकाट्यानें गिळावा लागला. बैठक संपल्यानंतर प्रधानमंत्री जनरल सिरोकी याने जाहीर केले — "आमच्या मित्रांनी आमच्याशी विश्वासघात केल्यामुळे आम्हाला शरणागती स्वीकारावी लागत आहे. चेकोस्लोव्हाकिया आज अगदी एकाकी पडलेला आहे."

असहाय चेकोस्लोव्हाकियाची ही क्किकाळी, वाटाघाटीचा विजयोत्सव साजरा करण्यात दंग झालेल्या फ्रान्सला ऐकू येणे शक्यच नव्हते.

चेंबर्लेन, हिटलर आणि मुसोलिनी यांच्या मदतीने दलादिए याने फ्रान्सला 'वाचविल्याबद्दल' सर्व फ्रेंच वृत्तपत्रांनी आपल्या प्रधानमंत्र्याची तोंड भरून प्रशंसा चालविली होती. उजव्या गटाच्या फ्लँदने तर म्युनिक-कराराबद्दल हिटलरचे अभिनंदन करणारी तार धाडली. लिआँ ब्लूमसारखा समाजवादीही आनंदाने बेहोष झाला होता. तो म्हणाला, "फ्रान्समधल्या प्रत्येक पुरुषाला आणि स्त्रीला दलादिए आणि चेंबर्लेन यांच्यासंबंधी कृतज्ञता वाटत आहे. या दोघांच्या प्रयत्नांमुळे युरोपवरचं युद्धाचं संकट टळलं आहे. आपण आपलं दैनंदिन काम करावं आणि सुखानं झोपी जावं अशी परिस्थिती पुन्हा निर्माण झालेली आहे. फ्रान्समध्ये शरद ऋतूतला सूर्यप्रकाश किती सुंदर दिसतो, किती सुखद असतो हे आता आपण निश्चित मनानं अनुभवू या."

चार ऑक्टोबरला फ्रेंच प्रतिनिधीसभेची बैठक भरून तीत ५३७ विरुद्ध ७५ मतांनी म्युनिक करारावर शिक्कामोर्तब करण्यात आले. विरोधी मत नोंदविणाऱ्या ७५ जणात ७३ कम्युनिस्ट सदस्य होते. त्यांचा या करारास विरोध नव्हता, परंतु म्युनिक येथल्या वाटाघाटींमध्ये रशियाला सहभागी करून घेतले नाही म्हणून ते रागावले होते आणि त्यापायी त्यांनी विरोधी मत नोंदविले.

म्युनिक कराराची कार्यवाही सुरू झाल्यानंतर, बेनेसवरचे हिटलरचे दडपण वाढू लागले आणि म्हणून त्याने राष्ट्राध्यक्षपदाचे त्यागपत्र दिले. तरीही हिटलरचा त्याच्यावरचा राग ओसरला नव्हता. आपल्या हस्तकामार्फत बेनेसचा खून करण्याचा त्याने बेत आखला. बेनेसला त्याचा सुगावा लागल्यामुळे तो प्रागमधून बाहेर पडला आणि एखाद्या निर्वासितासारखा लंडनला रहायला गेला.

बेनेससारख्या तडफदार माणसाला हिटलरच्या दडपणामुळे राष्ट्राध्यक्षपद सोडावे लागावे ही गोष्ट युरोपमध्ये फक्त एकाच माणसाला झोंबली. बेनेसच्या त्यागपत्राची बातमी कळताच हाऊस ऑफ कॉमन्समध्ये बोलताना विन्स्टन चर्चिल म्हणाला, "बेनेसचं त्यागपत्र हा म्युनिक–कराराचा अपरिहार्य परिणाम आहे. म्हणून मी म्हणतो की म्युनिक-करारावर स्वाक्षरी करून आपण आपल्या हातांनी आपला पराभव करून घेतलेला आहे."

चर्चिलची ही स्पष्टोक्ती, चेंबर्लेनच्या शांततावादाने भारावून गेलेल्या ब्रिटिश लोकप्रतिनिधींना रुचणे शक्यच नव्हते. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये चर्चिलच्या निषेधाच्या घोषणा उठू लागल्या. तरीही त्यामुळे चर्चिल भांबावून गेला नाही. या घोषणा थंडावल्यावर तो निश्चयी स्वरात म्हणाला, "पराभवांची मालिका येथेच संपली आहे असं समजू नका. हा तर केवळ प्रारंभ आहे."

म्युनिक–करार हा ब्रिटनप्रमाणे आपलाही पराभव आहे हे फ्रेंच नेतृत्वाला त्यावेळी उमगले नाही.

वस्तुत: फ्रान्सने चेकोस्लोव्हाकिया, पोलंड, युगोस्लव्हिया आणि रुमेनिया या चार पूर्व युरोपीय राष्ट्रांशी परस्पर-मदतीचे करार केलेले होते. त्यामुळे फ्रान्सने पुढाकार घेतला असता तर ही चारही राष्ट्रे फ्रान्सच्या खांद्याला खांदा लावून उभी राहिली असती आणि मग, चेकोस्लोव्हाकियाची मानखंडना करण्यापूर्वी हिटलरने दहा वेळा विचार केला असता. प्रथम ऑस्ट्रिया आणि नंतर चेकोस्लोव्हाकिया या दोन राष्ट्रांवर प्रभुत्व संपादन केल्यामुळे नाझी जर्मनीचे मध्य युरोपमधील स्थान अधिकच दृढ झाले.

परंतु याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट ही की चेकोस्लोव्हाकियाशी विश्वासघात करणाऱ्या फ्रान्सवर भरवसा ठेवायला पोलंड, युगोस्लाव्हिया आणि रुमेनिया यांची आता तयारी नव्हती. त्यामुळे होता होईल ता हिटलरशी मिळतेजुळते घ्यायचे असे त्यांनी ठरविले. दुबळ्या राष्ट्राच्या पोकळ मैत्रीपेक्षा सबळ शत्रूची मेहेरबानी परवडली असे म्युनिक-करारापासून पूर्व युरोपातील छोटया राष्ट्रांना वाटू लागले.

रशियाची प्रतिक्रियाही महत्त्वाची होती.

'जर्नल द मस्काव' या पत्राने आपल्या चार ऑक्टोबरच्या अंकांत लिहिले—"यापुढे फ्रान्सच्या शब्दावर विश्वास ठेवण्याचा मूर्खपणा कोण करील? कोणते राष्ट्र आता फ्रान्सच्या मैत्रीची अपेक्षा करील? चेकोस्लोव्हाकियाशी केलेला करार धुडकावून देणारा फ्रान्स रशियाबरोबर केलेला करार पाळील असा कोण भरवसा धरील?"

फ्रान्सच्या वर्तनाचा रशियाला संताप येणे स्वाभाविक होते. कारण युरोपच्या राजकारणामध्ये रशियाला काहीही स्थान नाही असे हिटलरला दाखवून द्यायचे होते आणि त्याची ही महत्त्वाकांक्षा म्युनिक येथे सिद्धीला गेली होती. या बैठकीसाठी रशियाला पाचारण करा असे सुचविण्याइतकेही फ्रान्सने धैर्य दाखविले नाही. त्यामुळे, मॉस्कोतील फ्रेंच राजदूत कोलोन्द्र म्युनिक कराराचा तपशील सांगू लागताच, रशियन उपपरराष्ट्रमंत्री व्लादिमिर पोटेम्किन खवळला, "म्युनिक येथल्या वाटाघाटींच्या वेळी तुम्ही मुद्दामच रशियाला वगळलं हे आम्ही विसरू शकत नाही. त्यातून एवढं करून तुम्ही मिळविलं तरी काय? काहीही नाही. उलट लवकरच पोलंडची चौथ्यांदा फाळणी होणार आहे हे लक्षात ठेवा."

पोटेम्किनचे हे शेवटचे वाक्य अतिशय सूचक होते. जर्मनी आणि रशिया यांच्यात समझोता झाला तरच पोलंडची फाळणी होऊ शकते हे कोलोन्द्र याला जाणवले. त्यामुळे पोटेम्कीनची भेट घेऊन आपल्या कचेरीत परतताच कोलोन्द्र याने परराष्ट्रमंत्री बॉन्ने याला कळविले—"१९३१ पासून जर्मनी आणि रशिया यांच्यात चालत आलेले वितुष्ट विसरायला हे दोन्ही देश तयार होतील अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. पोलंडची आपापसात वाटणी करण्यासाठी जर्मनी आणि रशिया यांच्यात मैत्रीचा करार होण्याची मला फार शक्यता वाटते."

कोलोन्द्रचा हा अंदाज अचूक होता. म्युनिक करारानंतर रशियाच्या परराष्ट्रीय धोरणात महत्त्वपूर्ण बदल होऊ लागला. रशियाला स्वतःच्या हितासाठी फ्रान्सपेक्षा जर्मनीच्या मैत्रीची मातबरी वाटू लागली.

कोलोन्द्र याने इशारा देऊनही फ्रान्सने या घटनेकडे साफ दुर्लक्ष केले.

या काळात केवळ फ्रेंच सरकारलाच पराभूत मनोवृत्तीने ग्रासले होते असे नव्हे. सेनानी, लोकप्रतिनिधी, वृत्तपत्रे आणि आम जनताही युद्ध टाळण्यासाठी काय वाटेल ते केले तरी चालेल अशा निष्कर्षाप्रत आलेली होती. शांततेच्या तात्कालिक उद्दिष्टापायी आपण आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला आणि प्रतिष्ठेला धोका निर्माण करीत आहोत हे प्रधानमंत्र्यापासून साध्या कामकऱ्याशेतकऱ्यापर्यंत आणि सरसेनानीपासून सामान्य सैनिकापर्यंत कोणीच ध्यानात घेतले नाही.

फ्रान्सचा स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास उरला नव्हता, मित्रांच्या मदतीचे मोल त्याला उमगत नव्हते. जाणवत होता तो फक्त हिटलरचा धाक.

१९३६ पासून फ्रान्सला स्वतंत्र परराष्ट्रीय धोरणही राहिलेले नव्हते. ब्रिटनने सांगावे आणि फ्रान्सने ऐकावे असाच एकंदर प्रकार होता. आपल्याला जर सन्मानाने जगायचे असेल तर आपल्याच सामर्थ्यावर आपल्याला निर्भय राहिले पाहिजे एवढे देखील भान उरले नव्हते.

आत्मभ्रशाची ही परिसीमा होती.

लोकसत्ताक राजवटीमध्ये केवळ सरकारवरच सारा दोष येत नाही. लोकमानसही तितकेच जबाबदार असते. या काळातील फ्रान्सचे वर्णन करताना एका फ्रेंच निरीक्षकाने 'सामुदायिक भ्याड वृत्तीचा अविष्कार' असे म्हटले आहे. पहिले महायुद्ध संपून अजून पुरी वीस वर्षेदेखील झालेली नसल्यामुळे 'नको तो संघर्ष अन् नको तो संहार' असे फ्रेंच जनतेला वाटणे स्वाभाविक होते. परंतु शेजारच्या रशियामध्ये आक्रमणखोर नेतृत्वाचा उदय झालेला असताना इच्छा असो वा नसो आपले स्वातंत्र्य जतन करण्यासाठी युद्धाला सामोरे जावेच लागते.

इतिहासाचा धडादेखील फ्रान्सने विसरावा हे मात्र समर्थनीय ठरत नाही.

फ्रान्सच्या नैतिक अधःपाताला सीमा उरली नव्हती.

ओटो अॅबेट्झ हा हिटलरचा हस्तक पॅरिसमध्ये राजरोस वावरत होता. पॅरिसमधले राजकीय कार्यकर्ते, लेखक, व्यापारी, प्राध्यापक या साऱ्या प्रतिष्ठितांशी त्याने संधान बांधले होते. हिटलरकडून मिळणाऱ्या पैशावर ओटो अॅबेट्झ या साऱ्यांना मद्य पाजीत होता, बर्लिनपर्यंतचा प्रवास घडवून आणीत होता. जर्मनीचा फुकट प्रवास करावयास मिळालेले हे विचारवंत मायदेशी परतल्यानंतर हिटलरचे गोडवे गाण्यात धन्यता मानीत होते. विद्वानांची आणि कलावंतांची सांस्कृतिक शिष्टमंडळे बर्लिनला जाऊन आल्यावर वर्तमानपत्रांना मुलाखती देत होती–' हिटलर फ्रान्सवर

कधीही आक्रमण करणार नाही अशी आपली खात्री पटलेली आहे.'

अनेक फ्रेंच लेखकांच्या कादंबऱ्यांचे जर्मन भाषेमध्ये अनुवाद होत होते आणि त्यापायी या फ्रेंच लेखकांना ते मागतील तेवढा मोबदला दिला जाई. फ्रेंच पत्रकारांना हिटलरच्या मुलाखतीसाठी नेण्यात येई. जाता येता त्यांची अशी सरबराई केली जाई की नंतर हिटलरची तारीफ करण्याच्या बाबतीत त्यांची स्पर्धा सुरू होई. हिटलरशी हस्तांदोलन करावयास मिळाले याचेच त्यांना कौतुक वाटायचे.

फ्रेंच पत्रकारांवर ओटो ॲबेट्झ भरमसाट पैसा खर्च करीत आहे हे पाहून त्याचा एक मित्र त्याला म्हणाला, "यापेक्षा तू पॅरिसमधली काही वृत्तपत्रेच का खरेदी करीत नाहीस ?"

ओटो ॲबेट्झ उत्तरला, "वृत्तपत्र विकत घेण्यापेक्षा पत्रकार विकत घेणे सोयीचे आणि इष्टही असते. आपण निःस्पृह आहोत असा विकत गेलेल्या पत्रकाराला देखील आव आणता येतो आणि त्यामुळे त्याच्या लिखाणावर लोकांचा चटकन विश्वास बसतो. असे पत्रकार आपल्याला उपलब्ध होत असताना वृत्तपत्रे कशाला खरेदी करायची ?"


फ्रान्सने केवळ सर्वच गमावले होते असे नाही तर तो स्वतःलाही पारखा झाला होता.

एखाद्या वैभवशाली प्रासादाचा पायाच खचावा असा काहीसा हा प्रकार आहे.

(क्रमशः)

---

पुढील लेखांक : शनिवार दिनांक २६ सप्टेंबर अंकात



स्वरधारा बरसणाऱ्या मेघाचे ईषत् दर्शन

# श्रीनिवास खळे – एक संकलन

कलावंताच्या हयातीत त्याच्या कलेचे मोल लोकांना समजत नसते, त्याच्या डोळ्यादेखत त्याच्या कलेचे चीज होत नाही असा इतिहासाचा दाखला आहे. पण सध्या हा दाखला चांगल्या अर्थाने खोटा पडू लागला आहे. सध्या कलावंताला त्याच्या कलेची प्रत्यक्ष दाद देणारे, त्याच्या कलेची गुणदोषचिकित्सा करणारे वाचक, रसिक आणि समीक्षक भेटू लागलेले आहेत. गेल्या वर्षीच लता गौरव-ग्रंथ प्रसिद्ध झाला. श्रीनिवास खळे एक संकलन हे पुस्तक त्याच धर्तीचे आहे. श्रीनिवास खळे या सुप्रसिद्ध संगीतदिग्दर्शकांच्या कलागुणांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा ते धावता परिचय करून देते.

ज्या सुहृदांनी हा परिचय करून दिला आहे त्यात पु. लं. सारखे रसिकवर्य, सुधीर फडके आणि हृदयनाथ मंगेशकर यांसारखे संगीत-दिग्दर्शक, लता मंगेशकरसारखी सर्वश्रेष्ठ गायिका, विजया राजाध्यक्ष आणि मंगेश पाडगावकर यांसारखे साहित्यिक अनंत बेडेकर आणि अशोक रानडे यांच्यासारखे संगीत समीक्षक आणि शास्त्रज्ञ इत्यादि सुपरिचित मान्यवर व्यक्तींचा समावेश आहे. त्याचप्रमाणे खळे यांच्या वर्तुळातील कमीअधिक प्रसिद्ध व्यक्तींनीही या परिचयाला हातभार लावला आहे. या सर्वांच्या लेखांचे संकलन श्री. खळे यांचे स्नेही श्री. शेरे यांनी केले आहे.

सुहास भालचंद्र बापट

पु. लं. नी खळे यांचे सांगीतिक वैशिष्ट्य आपल्या नेहमीच्या खुसखुशीत शैलीत सांगून त्यांना आशीर्वाद दिला आहे. भावगीतातील भावनेवर वा शब्दरचनेवर यत्किंचितही अन्याय न करता त्या गीताला बुद्धिमान अशी चाल देणे या खळे यांच्या संगीतवैशिष्ट्याची जवळजवळ प्रत्येक सुहृदाने नोंद केलेली आहे. आणि हे संगीत बुद्धिमान असले तरी त्याचा भारतीय संगीतपद्धतीशी समन्वय साधलेला आहे. 'हा समन्वय साधणे ही खरी करामत' असा उल्लेख सुधीर फडके यांनी आवर्जून केला आहे. याच संदर्भात 'परंतु काही वेळेला उंच भरारी मारणाऱ्या प्रतिभावंताच्या रचनेतून हा समन्वय नकळत सुटून जातो. आणि मग बालकवींचा आनंद पाश्चिमात्य वेषभूषेत टॉक टॉक असा ताल धरून नाचतो' ही त्यांनी मारलेली नाजूक कोपरखळीही लक्षणीय आहे.

सांगीतिक वैशिष्ट्यांबरोबरच खळे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक विशेष त्यांच्या संबंधीच्या या लेखनात प्रकट झाले आहेत. कमालीचे सहनशील, प्रसिद्धिपराङ्मुख, संगीताने नादावलेले आणि वेडावलेले असे हे व्यक्तिमत्त्व; व्यक्तिगत कौटुंबिक जीवनात शारीरिक आणि आर्थिक अस्वास्थ्याने त्यांचा आजपर्यंत दुर्दैवी पाठपुरावा केला. पण आता त्यांना त्यांच्या कलेला आधार देणारे असे व्यवसायक्षेत्री मिळाले आहेत. त्यामुळे त्यांच्या कलेला बहर येईल अशी आशा-अपेक्षाही अनेक निवेदकांनी व्यक्त केली आहे.

'भावगीताचे स्वरूप एक चर्चा' – हा या पुस्तकातील तात्त्विक भागही तितकाच उल्लेखनीय आहे. 'गीत आणि कविता' या शीर्षकाच्या अशोक रानडे आणि मंगेश पाडगावकर यांच्या शाब्दिक जुगलबंदीत, मुख्यत: गीतातील अनुस्यूत संगीत, गीताच्या आशयाला बांधून ठेवते काय या प्रश्नाची उद्‌बोधक चर्चा झाली आहे. तसेच 'शब्द आणि स्वर' या अशोक रानडे आणि श्रीनिवास खळे यांच्या संवादात गीताला चाल देणे म्हणजे काय आणि त्यासंबंधात खळे यांचा दृष्टिकोन काय या विषयाची चर्चा झाली आहे. हा छोटासा परिसंवाद जिज्ञासू अभ्यासकांना उपयुक्त वाटेल.

खळे यांनी संगीत दिलेली दहा गाणी आणि त्यांचे स्वरलेखन हे या पुस्तकाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य होय. सर्वसाधारण गायक-वादकाला त्याचा उपयोग होईल.

अशा पुस्तकांबाबत एक सूचना करावीशी वाटते. संबंधीत कलावंताच्या सगळ्या रचनांची एकत्रित अशी एक कालानुसारी यादी दिली तर सर्वसाधारण वाचकांना त्याच्या रचनेचे एकत्र दर्शन होईल. तसेच संदर्भ हवा असणाऱ्या जिज्ञासूंनाही तिचा उपयोग होईल. कारण बऱ्याच वेळा कलावंताचे नाव माहीत असते पण त्याच्या सगळ्या रचना माहीत नसतात. उलट काहीवेळा रचना माहीत असतात पण त्यांचा निर्माता माहित नसतो. ही अडचण अशा सूचीने दूर होईल, तसेच कलावंताचा व्यक्तिगत परिचय असाच एकत्रित आणि थोडक्यात दिला तर कलावंताविषयी रसिकाला स्वाभाविकपणे वाटणाऱ्या कुतूहलाचे थोडेफार पूर्ती होईल. या दोन्ही गोष्टी प्रस्तुत पुस्तकातील संकलनातून वाचकांसमोर येतात पण बऱ्याच अपूर्णतेने आणि

अप्रत्यक्षतेने, म्हणून रचनासूचीच्या आणि चरित्रवजा व्यक्तिपरिचयाच्या आवश्यकतेचा मुद्दाम वेगळा उल्लेख केला आहे.

पद्मा सहस्रबुद्धे यांनी तयार केलेले ध्वनिमुद्रिकासदृश मुखपृष्ठ पुस्तकाला आकर्षक उठाव आणणारे आहे. श्रीनिवास खळे यांच्या स्वरमय व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून दिल्याबद्दल संकलक श्री. शेरे यांना धन्यवाद.

**श्रीनिवास खळे : एक संकलन : सौ. शुभा शेरे; गोरेगाव मुंबई ६२ : मूल्य आठ रुपये.**

# बर्ट्रँड रसेल यांची पत्रे

नुकतेच दिवंगत झालेले ब्रिटिश तत्त्वज्ञ बर्ट्रँड रसेल यांचा पत्रव्यवहार फार मोठा होता. जगाच्या साऱ्या भागातून त्यांना पत्रे येत. पत्रे लिहिणारी मंडळी कोणी बडी असत असे नाही. अनेक सामान्य माणसे पृच्छा करण्यासाठी, शंका निवारून घेण्यासाठी , काही माहिती मिळवण्यासाठी, त्यांच्या मतावर मल्लिनाथी करण्यासाठी, नुसते त्यांना 'काय कसे काय?' असे विचारण्यासाठी, शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी, रसेलना पत्र पाठवत असत. रसेल यांच्यासारख्या कार्यव्यग्र महापंडिताने या पत्रांची दखल घेतली नसती तर त्यांना कोणी बोल लावला नसता. पण या महापंडिताला सामान्यांबद्दल अतीव आस्था होती; म्हणून आलेल्या बऱ्याच पत्रांना आवर्जून उत्तरे पाठवण्याचा त्यांचा परिपाठ होता. या स्पष्ट, मनमोकळ्या पत्रातून रसेल यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठे मोहक दर्शन होते.

या पत्रांपैकी काही लक्षणीय पत्रांचे पुस्तकरूपाने संकलन बॅरी फाइनबर्ग आणि रोनाल्ड कास्रिल्स या संपादकद्वयाने केले असून ते नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. पुस्तकाचे नाव आहे : ' डियर बर्ट्रँड रसेल. '

पुस्तकातील पहिले पत्र फोर्मोसामधील एका चाहत्याचे आहे. तो लिहितो :
' प्रिय लॉर्ड रसेल—

लॉर्ड रसेल, तुम्ही कसे आहात ?

आपला,
फ्रेडरिक टी. लिन. '

त्याला रसेलनी पुढील उत्तर लिहिले :

' प्रिय श्री. लिन—

पत्र पाठवल्याबद्दल आभारी आहे. मी खुशाल आहे. अण्वस्त्रबंदीसाठी माझी धडपड चालली आहे. हे काम महत्त्वाचे आहे असे मला वाटते.... तुम्ही खुशाल आहात, अशी मला आशा आहे. आपल्याला मी शुभेच्छा व्यक्त करतो. तुम्ही पाठवलेल्या तुमच्या छायाचित्राबद्दल आभार.

आपला,
बर्ट्रँड रसेल. '



पौगंडावस्थेतील एका चिंतातुर मुलाने त्यांना पुढील पत्र पाठवले होते :

'हस्तमैथुनाबद्दल तुमची मते काय आहेत ते जाणून घ्यायची माझी फार इच्छा आहे....मी मागे हस्तमैथुन केले आहे; त्याची माझ्या मनाला टोचणी लागून राहिली आहे....आत्महत्येचा विचारही सारखा मनात येतो. या अडचणीतून सुटण्यासाठी कृपावंत होऊन आपण मला काही मार्गदर्शन कराल काय ?– तीच माझी शेवटची आशा आहे.'

रसेलनी त्याला उत्तर लिहिले :–

'प्रिय महाशय,

हस्तमैथुनाबद्दल बोलायचे तर वाढाळू वयात जवळ जवळ प्रत्येकजण ते करत असतो. मुलांना मर्यादेत ठेवण्यासाठी, ते अनिष्ट आणि अमंगल आहे, असे मोठी मंडळी म्हणत असतात. अपराधीपणाची तुमची भावना अगदी अनाठायी आहे; कारण हस्तमैथुनाने काहीच अपाय होत नाही.'

जीवनातील लहानमोठ्या अनेक अंगांना ही पत्रे स्पर्श करतात. त्याबद्दलची या महान जीवनभक्त विचारवंताची उत्स्फूर्त मते आपल्याला सांगतात. आणि ती सारी किमान वाचनीय तर खचितच आहेत. ('बुक्स अँड बुकमेन 'मधून)

□ □ □

विज्ञानधारा

डॉ. नरेंद्र दाभोळकर

# कर्करोग

## विज्ञानाच्या गरुडझेपेस आव्हान

विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत विज्ञान कोणते चमत्कार दाखवेल? अतोलोच्या वेगाने जाणाऱ्या विज्ञानाबद्दल हा अंदाज वर्तविणे खरोखरच अवघड आहे. सध्या दर दहा वर्षांनी जगातले शास्त्रीय ज्ञान दुप्पट होत आहे.

पण तरीही काही आघाड्यांवर दारुण पराभव आहेच. वैद्यकीय विश्वातील कर्करोग ही अशी एक समस्या आहे. रोग कशाने नेमका होतो याचे कारण माहीत नाही. चोराच्या पावलाने शरीराच्या कोणत्याही भागात प्रवेश करणारा रोग घरातच ठाण मांडून घर मालकाला कधी बाहेर काढतो याचा पत्ताही लागत नाही. आणि लागतो त्यावेळी बहुधा फार उशीर झालेला असतो. अर्थातच ह्या अडचणीमुळे उपायाचे स्वरूपही नेमके राहू शकत नाही.

ह्या रोगाशी मुकाबला करण्याचा प्रयत्न सर्व जगात हजारो शास्त्रज्ञ करत आहेत. कातडीचा कर्करोग बरा करण्यासाठी ज्या पद्धतीने जर्मन आणि फिनलंड येथील शास्त्रज्ञांनी यश मिळविले तो खूप उत्साहवर्धक आहे. यातही या रोगाचे वैशिष्ट्य असे की रोगावर परिणामकारक ठरणारे औषध मुळी शरीरातच तयार होत असते.

शरीरातील पेशींची विभाजन होण्याची जी क्रिया सतत चालू असते त्या प्रक्रियेवर योग्य ते नियंत्रण ठेवण्याचे कार्य कॅलोन (chalon) हे द्रव्य करत असते. कुठल्याही भागाचा आणि कोणत्याही प्रकारचा कर्करोग असला तरी त्यामध्ये कारण एकच असते व ते म्हणजे शरीराच्या पेशींचे जरूरीपेक्षा अधिक प्रमाणात आणि वेगळ्या प्रकारे विभाजन होऊ लागते. आणि याचे अनेक परिणाम भोगावे लागतात.

शास्त्रीय संशोधनाप्रमाणे कर्करोगाची ही क्रिया ज्यावेळी सुरू होते त्यावेळी शरीरातील कॅलोनचे प्रमाण अतिशय कमी झालेले असते. आपल्या त्वचेचे जे अनेक थर असतात त्यापैकी सर्वात वरच्या लगेच खाली जो थर असतो त्यामध्ये कॅलोन तयार होतो आणि नव्या पेशींची निर्मिती आणि जुन्यांचा नाश याचा तोल सांभाळते. कर्करोगात आणि विशेषतः कातडीच्या कर्करोगात हा तोल संपूर्णपणे बिघडला जातो.

कर्करोगपेशी हे कॅलोन तयार करतात पण अगदीच अपुऱ्या प्रमाणात !

तेव्हा कातडीवरच्या वाढत्या गाठीला आळा घालण्यासाठी कृत्रिमरीत्या कॅलोनचे हे प्रमाण शरीरात वाढवले जाते. विशिष्ट रासायनिक पद्धतीने उत्तम प्रकृतीच्या व त्वचेच्या लोकांपासून कॅलोन वाढले जाते आणि ते कर्करोग्याच्या शरीरात टोचून त्याच्या शरीरातील कॅलोनचा साठा वाढविण्यात येतो. निकाल उत्साहवर्धक आहेत. शरीरावरची गाठ वेगाने कमी होते. रक्तस्राव कमी होतो. वेदना थांबतात. काही वेळा तर रोगी संपूर्णपणे बरा होतो.

या प्रकारच्या सर्व शोधाची परिपूर्णता होऊन सर्व प्रकारचे कर्करोग प्राथमिक अवस्थेत हमखास ओळखणे आणि लगेच बरा करणे यासाठी जवळ जवळ विसाव्या शतकाचा शेवट उजाडेल.

विज्ञानाची गरुड भरारी ओळखणाऱ्या शास्त्रज्ञांचे हे मत आहे, अर्थात ते लवकर खोटे ठरले तर आनंदच वाटेल.

## संततिनियमन

दर वर्षी भारताची लोकसंख्या अडीच टक्क्याने वाढते. याचा अर्थ दर दहा वर्षांनी एक नवी अमेरिका आपण आपल्या देशात तयार करतो. आणि पुन्हा स्थितप्रज्ञपणे (!) निक्सन साहेबांना कळवितो, ' मूल जन्माला आले आहे. दुधाच्या बाटलीची आणि गव्हाच्या रोटीची तयारी ठेवा. '

समृद्धीचे युद्ध हे अनेक आघाड्यावर खेळावे लागते.

अन्न स्वतंत्रता संचलन हा त्यावर एक उपाय आहे.

कुटुंब नियोजन हा दुसरा प्रभावी पर्याय आहे.

अनेक बाबतीत अमेरिकेचे (अंध) अनुकरण करणाऱ्यांना कुटुंबनियोजनाची त्या देशातील माहिती उद्बोधक ठरेल.

श्रीमंत आणि सुशिक्षित अमेरिकेत संतति प्रतिबंधक गोळ्यांचा मार्ग अधिक सोईस्कर वाटतो. १९६० साली या गोळ्यांच्या बाबतीत खुला वापर करण्यास अमेरिकेत परवानगी देण्यात आली. ह्या गोळ्यांनी गेल्या आठ वर्षात अमेरिकेतील जननप्रमाण वीस टक्क्याने घटले आहे.




# घडीघडीला जमत रंगत, कोका-कोलाची जर संगत

मन लावून खेळण्यात केवढी गंमत असते पहा! शिवाय, कोका-कोलाची सोबत एक वेगळाच रंग भरते त्यात. कोका-कोलाचा स्वाद असा रुचकर नि उत्साहदायक असतो की, पुन्हा पुन्हा कोका-कोलाच प्यावासा वाटतो. जगभर कुठेहि पहा, केव्हाहि पहा, कोका-कोला पिणाऱ्यांची संख्या वाढतेच आहे. वाहवा! कोका-कोला, अशी लज्जत एरवी कुठून मिळणार!

Enjoy Coca-Cola

कोका-कोला, हा कोका-कोला कंपनीचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे.

CMCC-13-162 MR

पतीबरोबर वैवाहिक जीवन उपभोगणाऱ्या सुमारे चाळीस लाख स्त्रिया या गोळ्या नियमितपणे वापरतात. सुमारे ६५ लाख स्त्रियांनी त्या योग्य वेळी वापरल्या होत्या. पंचावन्न वर्षाच्या आतील या पाहणीत नुकत्याच लग्न झालेल्या, लग्न न केलेल्या वा लग्नानंतर पतीपासून काही कारणाने दूर रहाणाऱ्या स्त्रियांचा समावेश नाही. अमेरिकेत किती प्रचंड प्रमाणात या गोळ्यांचा वापर होतो हे यावरून सहज दिसते. गोळ्या वापरणाऱ्या सुमारे ८५ टक्के स्त्रिया त्या गर्भ धारणेचा प्रतिबंध करण्यासाठीच वापरतात. मासिक पाळीतील त्रास, अनियमितपणा वा इतर कारणासाठी गोळ्या वापरण्याचे प्रमाण पंधरा टक्के आहे.

१९६० मध्ये कोणत्याच प्रकारच्या संततिनियमनाचे साधन न वापरणाऱ्यांचे प्रमाण पंचाहत्तर टक्के होते. आज गोळ्यांच्या सहाय्याने नियमन करणाऱ्यांची संख्या पंचावन्न टक्क्याच्या वर गेली आहे. इतर मार्गांचा वापर करणाऱ्यांची संख्या निराळीच ! ह्या गोळ्यांच्यामुळे होणाऱ्या त्रासाची I. P. P. F. ( International Planned Parenthood Federation ) ह्या जागतिक तज्ञांच्या समितीत नुकतीच चर्चा झाली. न्यूयॉर्क येथे जगातील अनेक स्त्री–रोग तज्ज्ञांची मते विचारण्यात आली. गोळ्यांमुळे कॅन्सर होणे, रक्तवाहिनीत गाठी होणे, मुलामध्ये जन्मजात विकृती उत्पन्न होणे, रक्तस्राव वाढणे, जननक्षमता कायमची कमी होणे ह्या सर्व आरोपांची काळजीपूर्वक छाननी करण्यात आली. आणि गोळ्या वापरण्यास यापैकी कोणतीही भिती बाळगण्याचे कारण नसल्याचे सांगण्यात आले.

अमेरिकेच्या संदर्भात विचार करता आणखी काही निष्कर्ष मनोरंजक आहेत. प्राथमिक शाळेतच ज्यांच्या शिक्षणाची समाप्ती झाली अशापैकी सुमारे पंधरा टक्के स्त्रियांना संतति नियमनाच्या एकाही मार्गाची माहिती नव्हती. माध्यमिक शाळा शिकलेल्यात हे प्रमाण २ टक्के होते. तर कॉलेजातील २५ मुलींनी गोळ्या वापरलेल्या होत्या. संततिनियमनाच्या कोणत्याच प्रकाराचे नाव न ऐकलेल्यांचे प्रमाण अमेरिकन निग्रोत १०% आहे, तर अमेरिकेतील गौरवर्णीय स्त्रियात हे प्रमाण अवघे ३% आढळते. पंचवीस वर्षे वयाच्या गौरवर्णीय महिला आणि निग्रो यांच्यात गोळ्या वापरण्याच्या प्रमाणात खूपच तफावत आढळते, परंतु तीस ते पस्तीसच्या दरम्यान हा फरक कमी होतो.

कॅथॉलिक चर्चला अर्थातच हे कोणतेच प्रकार मान्य नाहीत. कॅथॉलीक स्त्रियात गोळ्या वापरणाऱ्यांचे प्रमाण २१% आहे. आणि त्यापैकी बहुतेक त्या वैद्यकीय कारणासाठी वापरतात. कॅथॉलिक नसलेल्यांच्यात हे प्रमाण ३५ टक्क्याच्या आसपास येते.

एकदरीत पाहता गोळ्या हे सर्वात सुलभ साधन म्हणून अमेरिकन स्त्रियांनी स्वीकारले आहे. सातत्याने होणाऱ्या प्रयोगाने गोळ्यांमुळे होणारे किरकोळ त्रास थांबविण्यात बरेच यश आले आहे. दररोज एक गोळी असे साधे गणित व्हावे

म्हणून महिन्याच्या गोळ्यांच्या पाकिटात ज्या दिवशी गोळ्या घ्यावयाच्या नसतात त्या दिवसासाठी टॉनिकच्या गोळ्या ठेवलेल्या असतात. त्यामुळे नियमित-पणा आणि प्रकृति सुधारणा असा दुहेरी फायदा होतो.

समृद्धीच्या शिखरावर असलेल्या अमेरिकेलाही संततिनियमनाचा प्रभावी प्रचार करावा लागतो आपला देश गरीब आहे पण परवडणारे व परिणामकारक उपाय आपणही योजायला हवेत. आपल्याकडे अनेक सुशिक्षितही संततिनियमनाच्या प्रचाराबद्दल नाके मुरडतात. गैरसमजही खूप. नसबंदी केल्यावर कमजोरी येते या चुकीच्या समजुतीने कित्येक शहाणेसुरतेही त्याला तयार नसतात.

—शास्त्रात श्लील अश्लील काहीच नसते. विज्ञानातील विशेषतः वैद्यकीय क्षेत्रातील सर्व समस्यांची मोकळी चर्चा करणे, अनेक क्षेत्रातील गैरसमज दूर करणे आणि निकोप व नेमकी शास्त्रीय दृष्टी तयार करणे हीच मला वाटते विज्ञानेश्वरी-तील ईश्वराची उपासना ठरेल.

□ □ □

---

## गनिमी हल्ल्याची लक्षणे

शरीरावर एखादी गाठ येते. ती वाढत नाही. दुखत नाही. त्यामुळे त्यासाठी डॉक्टरांकडे जाण्याची तसदी आपण घेत नाही. कर्करोगाचे हे शांत स्वरूप ज्यावेळी रौद्र अथवा आक्रमक रूप धारण करते त्यावेळी त्या गाठीत खालील बदल घडतात.

— गाठीची वाढ वेगाने होते.

— गाठ दुखू लागते.

— ती दगडासारखी कठीण लागू लागते.

— काहीवेळा रक्तस्राव चालू होतो.

— गाठीच्या रक्तवाहिन्यांच्या व मज्जातंतूवरच्या दाबामुळे त्या भागाचा रक्तपुरवठा व संवेदना क्षीण होते.

— गाठीच्या जवळच्या भागातलेLymph node वाढतात.

— रोग्याला डॉक्टराकडे चटकन नेणं अत्यावश्यक आहे. डॉक्टर तुमच्या काही उपयोगी पडेल अशी ती बहुधा शेवटची संधी असेल. नाहीतर थोड्या दिवसाच्या दिरंगाईने फार उशीर होईल.

---

पृष्ठ १४ वरून

ठरला आहे. वास्तविक मुंबईतल्या (किंबहुना कुठल्याही शहरातल्या) कित्येक श्रीमंत-मध्यमवर्गीय कुटुंबाच्या नाड्या आवळून टाकायचं सामर्थ्य ह्या तीन लाख हातात आहे. आणि त्यांनी त्या तशा आवळल्या तर मला खात्री आहे की दक्षिण-मध्य-उत्तर मुंबईतल्या लक्षावधी गृहिणींच्या (गृहस्थांच्याही हे ओघानंच आलं !) तोंडचं पाणी पळून जाईल. असा पेचप्रसंग आताच उभा राहत आहे असं मात्र मुळीच नाही. परंतु आज उद्या तो उभा राहणारच नाही अशीही ग्वाही कुणी देऊ शकणार नाही. आज तो उभा राहू शकत नाही कारण हा वर्ग आज विस्कळीत आहे. त्यांच्या नोकरीचं 'घटक' स्वरूप, ज्या घरी ते काम करतात त्यांच्याशी असणारे त्यांचे संबंध, विविध घरातलं कामाचं वेगळं स्वरूप ह्यामुळे त्यांची संघटना बांधण्याचं कामही सध्या कठीण आहे. परंतु उद्या मुंबईलगतच्या औद्योगिकरणाला गती मिळाली की हा घरगडी अन्यत्र कारखान्यातून कामाला जाऊ लागेल. त्यावेळी मुंबईत घरगड्यांची चणचण भासू लागेल. आणि तीच संधी साधून, आज अपेशी ठरलेले डावे पक्ष घरगड्यांच्या संघटना उभारू शकतील. घरगड्यांची ही टंचाई मुंबईत आजच भासू लागली आहे. जुहू, गोरेगाव, सांताक्रूझ वगैरे भागात नव्यानं राहायला गेलेल्यांना ह्याची चुणूक दिसून आली आहे. पुढील काळात ही टंचाई तीव्र होत जाईल. त्याचवेळी घरगड्यांच्या संघटना बांधायचं काम गती घेऊ लागेल. पुढचं चित्र कुणीही रेखाटू शकेल !

आज मात्र ह्या तुटक तुटक संघटना पूर्णपणे उपेक्षिल्या जात आहेत. सायनला एका 'कार्यकर्त्यानं' मोठं मार्मिक वाक्य ऐकवलं. तो म्हणाला, 'कसल्या संघटना? अहो संपाची हाक दिली, आळीतल्या आमच्या बायांना, रामांना गोळा करून सांगितलं की उद्या कामावर जायचं नाही, तर सारी हा, हा म्हणतात. पण दुसरे दिवशी मात्र हळूच घरोघरी जाऊन कामं करून येतात. फक्त दिवसातून दोनदा जायच्या ऐवजी एकदा जातात एवढंच काय ते ! एक वेळा जाऊन देखील काम करून दिलं की बाकीचं घरातल्या बायका सांभाळून घेतात...झालं की सगळ्याचंच ओंऽऽफस् !' घरगड्यांची, त्यांच्यातल्याच 'पुढाऱ्यानं' ऐकवलेली ही कहाणी त्यांच्या वृत्तीची द्योतक वाटली मला. जिथे काम करायचं त्या घराशी आपुलकी दर्शविणारी ही वर्तणूक, आणि त्याच ठिकाणी चोऱ्या केल्याचे त्यांच्यावरचे आरोप ह्या दोन्हीत मला अर्थात च विसंगती वाटली. म्हणूनच, त्याच कार्यकर्त्याला-गोविंदा खताळना मी छेडलं. त्यावर खताळ म्हणाले, 'अहो साहेब, एक दोन उदाहरणं घेऊन साऱ्या 'रामांना' चोर ठरवणं कसं शक्य आहे? गाव तिथं महारवाडा तसे आमच्यात पण वाईट लोक आहेत...सारे 'रामा' चोर म्हटले तर मुंबईत रोज

लाखो चोऱ्या व्हायला हव्यात. हजारो मुडदे पडायला हवेत...साहेब, मी काही शिकलेला नाही. पण पेपर बघतो. तुम्हीच सांगा चोऱ्या करताना सांपडलेली मुलं कशी असतात. बहुतेक ठिकाणी कामाला लागून दोन-चार दिवस, फार म्हणजे आठवडा झालेली मुलंच चोरी-प्रकरणात गुंतलेली दिसतील...

खताळ ह्यांच्या ह्या उद्गारांना एका पोलीस अधिकाऱ्यानंही पुष्टी दिली. त्यांच्या मते तर, 'ह्यातल्या निम्म्या चोऱ्या गृहिणींच्या (किंवा गृहस्थांच्या) हलगर्जीपणामुळे, निष्काळजीपणामुळे होतात!' चोऱ्यांचं विश्लेषण करताना हे पोलीस अधिकारी पुढे म्हणाले, 'आपण नीट बघितलं तर असं आढळून येईल की खटखटी, वारंवार नोकर बदलणारे ह्यांच्याकडेच अशा चोऱ्या होतात!... घरगडी हाही माणूसच आहे व त्यालाही काही मानापमान असतात हे विसरलं जातं तिथेच ह्या खटखटी चालू होतात. नोकर टिकेनासे होतात. त्या भागातले भुरटे चोर अशा संधीचा फायदा घेऊन घरगड्यांच्या स्वरूपात त्या घरात शिरतात. त्यातनंच चोऱ्यांचा इतिहास निर्माण होतो...तुम्हाला अगदी खरं सांगायचं तर अशा काही केसेस आल्याच तर तिकडे मी साफ दुर्लक्षच करतो!' भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या परळच्या कचेरीत बसलो असता, एक कार्यकर्ते श्री. मोरे ह्यांनीही काहीसे असेच विचार व्यक्त केले. त्यांच्या मते, 'काही अगदी किरकोळ चोऱ्या घडतात त्या नैसर्गिक मानल्या जाव्यात. घरगडी हा साधा, दोन वेळच्या अन्नाला मोताद असलेला माणूस, त्याला कधी मोह सुटावा हे अनैसर्गिक निश्चित नाही. परंतु मोठ्या ज्या चोऱ्या घडतात, क्वचित खुनाचे प्रकार घडतात, त्यात मात्र घरगड्यांचा निश्चित संबंध नसतो...घरगड्यांच्या रूपानं घरातून शिरलेले अट्टल गुन्हेगारच ह्या अशा चोऱ्यांच्या मागे असतात...तो वर्गच वेगळा!...'

श्री. खताळांच्या एका वाक्यानं मात्र मी चांगलाच मुढावलो. घरगड्यांच्या चोऱ्याच्या संदर्भात बोलताना ते म्हणाले, '...खायला नाही, प्यायला नाही, ल्यायला नाही त्यामुळे जगायची चीड, तरी मरायची भिती! अशा निराश परिस्थितीत भकास डोळ्यांपुढे धन्याकडचं श्रीमंती जीवन उधळत असतं. जगायला आसुसलेलं कुठलं मन अशा अवस्थेत शांत राहू शकेल. मिळाली संधी तर हात मारणारच!...' त्यांच्या ह्या तत्त्वज्ञानाने मी चांगलाच चमकलो. काही दिवसांपूर्वी श्री. विजय तेंडुलकरांकडे बसलो असता त्यांनी सांगितलेल्या एका किस्स्याची आठवण झाली. 'रविंद्र सरोवर' प्रकाराच्या नंतर लगेचच कलकत्त्यात एका नक्षलवाद्यानं त्यांना ऐकवलेले उद्गार त्यांनी मला सांगितले होते. नक्षलवाद्यांचे ते उद्गार आणि खताळांचे वर उद्धृत केलेले विचार ह्यात कमालीचं साम्य होते. आणि त्याहीपेक्षा विशेष म्हणजे त्यात एक उघडं नागडं सत्य होतं! राष्ट्रवाद, सेक्युलरवाद, समाजवाद, बहुजन समाजवाद वगैरे वगैरेंचा उगीचच वेळोवेळी जल्लोष करणारांनी हे सत्य वेळीच नीट उमगून घेतलं पाहिजे. नुसत्या राष्ट्रवादाच्या आणि




समाजवादाच्या घोषणांनी नक्षलवाद निपटता येणार नाही हेही जाणलं पाहिजे. आणि राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता, समाजवाद वगैरेंपेक्षा वर उद्धृत केलेले सत्य अधिक शाश्वत आहे, नि म्हणूनच हृदयाला जाऊन भिडणारं आहे! माफ करा मंडळी,! घरगड्यांवरनं केलेले हे जाडेजुडे विषयांतर पेलवणार नाही हे मान्य. पण ओघानं आलं ते सांगितल्यावाचून राहवले नाही! असो.

...कम्युनिस्ट पक्षाच्या कचेरीत श्री. मोऱ्यांशी गप्पा बऱ्याच रंगल्या. घरगड्यांच्या संघटना कम्युनिस्ट पक्षानं बांधायचा प्रयत्न पूर्वी केला होता असं सांगून श्री. मोरे म्हणाले, ' परंतु ह्या संघटना तग धरू शकल्या नाहीत. एक तर कुठलीही संघटना उभारायला जो एकसंध मजूरवर्ग लागतो त्याचा इथे संपूर्ण अभाव होता. वेगवेगळ्या घरातून, वेगवेगळ्या परिस्थितीत काम करणारा, संपूर्णपणे विस्कळीत असा हा वर्ग. वर्गलढा उभा करण्याच्या दृष्टीने पूर्णपणे अयोग्य! त्यातच प्रत्येक घरगडी हा कायम स्वरूपाचा घरगडीच असेल असेही नाही. अर्थातच ह्या व्यवसायात येणाऱ्या जाणाऱ्या व्यक्ती नेहमीच वेगवेगळ्या! अशा परिस्थितीत सभासद वाढवायचे कसे नि संघटना बांधायची कशी?...सर्वसाधारणपणे ' टीन एजर्स ' ह्या व्यवसायात असतात नि काही स्त्रिया. पुढे कारखान्यातून नोकरी मिळाली की ही मंडळी हा व्यवसाय सोडतात...बरं, ज्यांच्या विरुद्ध ह्या घरगड्यांची संघटना बांधायची तो वर्गही बहुसंख्य मध्यमवर्गीयच! ह्या मध्यमवर्गीयांचेच प्रश्न हाताळायची आज वेळ आली आहे. महिन्याची दोन टोकं

गाठायची कशी हा त्यांच्यापुढचा प्रश्न. त्यांच्याविरुद्ध कुठले वर्गयुद्ध पुकारणार... मला वाटतं सद्य:स्थितीत, घरगडी ज्यांच्याकडे कामं करतात त्यांनी ह्या घरगड्यांना सहानुभूतिपूर्ण वागणूक द्यावी एवढाच ह्या प्रश्नावर उपाय आहे !...' ठाकुरद्वारच्या प्रजासमाजवादी पक्षाच्या कचेरीतही जवळजवळ हेच विचार ऐकायला मिळाले.

'घरगड्यांची संघटना बांधता येत नाही, बांधली गेली तरी ती प्रभावी ठरू शकत नाही. घरगड्यांच्या प्रश्नांपैकी हा एक महत्त्वाचा प्रश्न ! त्यामुळे घरगडी उपेक्षित राहतो हेही खरंच ! पण त्याचबरोबर हेही मान्य केलंच पाहिजे की सर्वसाधारण कामगार संघटना उभारायला जे 'पोटेन्शियल' आवश्यक असतं ते ह्या घरगड्यांच्या प्रश्नात नाही ...साहजिकच कुठलाही राजकीय पक्ष ह्या प्रश्नाचं भांडवल करू शकत नसल्यानं त्यात 'इंटरेस्टेड' नाही....' इति एक जनसंघीय कामगार कार्यकर्ता. 'राजकीय इंटरेस्ट' नसला तरी सामाजिक प्रश्न म्हणून ह्या प्रश्नाला का हात घातला जाऊ नये ?' ह्या माझ्या प्रश्नाला अर्थातच मौनाने उत्तर मिळालं. एके ठिकाणी 'हा प्रश्न शासनाने सोडवावा' असंही उत्तर मिळालं. आणि शासन ? असा काही प्रश्न मुंबईपुढे आज आहे ह्याचीच मुळी शासनाला कल्पना आहे की नाही कोण जाणे ! कुणीतरी सुचवले समाजकल्याण खात्याकडे चौकशी करावी. म्हणून समाजकल्याणमंत्री श्री. भास्करांकडे फोन लावला. उत्तर मिळाले, 'साहेब बाहेर गेलेत.' दुसरे दिवशी वृत्तपत्राने सांगितले, 'साहेब मनिलाला गेलेत !' शेवटी एका शासकीय कर्मचाऱ्याला गाठले. अर्थात अधिकारी ! उत्तर मिळाले–'अशी एखादी योजना सध्यातरी शासनाच्या विचाराधीन नाही. एखादी संघटना उभी राहिली नि तिने विधायक मार्गांनी ह्या प्रश्न हाताळायला सुरुवात केली तर शासन निश्चित सहकार्य देईल....'

आणि नकारात्मक किंवा संघर्षात्मक चळवळींच्या भांडवलावर उभ्या राहणाऱ्या 'युनियन्स पेक्षा विधायक मार्गांनी समाजजीवनात खोलवर शिरूनच हा प्रश्न समाधानकारकपणे मार्गी लावता येईल असं मला वाटतं. ह्या प्रश्नाचं गांभीर्य अधिक वाढतं त्याचं कारण म्हणजे ह्या प्रश्नाशी निगडीत असलेले दोन वर्ग. प्रत्यक्ष घरगडी आणि दुसरा वर्ग प्रामुख्यत: मध्यमवर्गीय. ह्या दोन्ही समाजघटकांना खडतर जीवनाला तोंड द्यावं लागत आहे. त्यांना आपसात झुंजायला लावणारा हा प्रश्न. ह्या झुंजीत न्याय-अन्याय बाजूलाच राहील; पण फायदा मात्र कुणाचाच होणार नाही. प्रश्न, मी वर म्हटल्याप्रमाणे, जर पुढे मागे डाव्यांनी संघर्ष प्रश्न म्हणून हाताळायला सुरूवात केली तर, परिस्थिती बिघडेल. एकंदर समाजजीवनालाच कीड लागेल. आणि आज ना उद्या, आज स्वारस्य दाखवीत नसलेले डावे गट, ह्या प्रश्नाचं जरूर भांडवल करतीलच ! म्हणूनच आजच हा प्रश्न सामाजिक पातळीवरून हाताळायची फार मोठी आवश्यकता आहे. ह्या संदर्भात, पुन्हा एकदा




अपरिहार्यपणे श्री. डाह्याभाई शहांची योजना दृष्टीसमोर येते. अर्थात अशी योजना राबवणं कष्टप्रद राहणार हे उघड. संघर्षात्मक चळवळीला जी प्रसिद्धी मिळते तिचा जो गाजावाजा होतो, तसला काही प्रकार ह्या पद्धतीनं योजलेल्या विधायक चळवळींच्या बाबतीत होणार नाही. विनोबांच्या 'भूदान' चळवळीलाही जिथे हा अनुभव आला तिथे घरगड्यांच्या प्रश्नाला वेगळी वागणूक समाज देईल हे संभवत नाही. साहजिकच, अधिक लोकशिक्षण, अधिक प्रचार, योजनापूर्वक कार्यक्रमांची आखणी वगैरे अनेक जबाबदाऱ्या संचालकावर येणार. श्री. शहांनाही ह्याची जाणीव असावीशी भासल.

घरगड्यांचा हा प्रश्न फक्त मुंबईत आहे असे नाही. औद्योगिकरणाच्या लाटे-नंतर जगभर जवळ जवळ सर्वत्रच तो बिकट झाला. भारतभरही तो तसाच पसरणार. पाश्चात्य देशात तर ह्या घरगड्यांची टंचाई अतिशय तीव्रतेनं जाणवली. आज तिथे जनतेला घरगडी मिळवून देण्यासाठी मोठमोठाल्या संस्था अविरत कार्य करतात. घरगड्यांचं उत्पन्नही मोठ असतं. जपानसारख्या पौर्वात्य पण विकसित देशातही, तपशीलातला फरक वगळता, जवळ जवळ हीच परिस्थिती आहे. परंतु ह्या देशातल्या परिस्थितीतही फरक आहे. ह्या पुढारलेल्या देशात एवढं प्रचंड यांत्रिकीकरण झालं आहे, सुविधा उत्पन्न झाल्या आहेत, जीवन इतकं सुटसुटीत

बनलं आहे की, साधारण कनिष्ठ मध्यमवर्गीय समाजाचं अशा घरगड्यांवाचून काही अडत नाही. अर्थातच अशा राष्ट्रांमधल्या घरगड्यांच्या संस्थांचा अभ्यास, भारतात उपयोगी पडणार नाही. परंतु पूर्व आफ्रिकेत ह्या घरगड्यांचं सुंदर सूत्र-संचालन कसं केलं जातं ह्याचा मात्र अभ्यास निश्चित उपयुक्त ठरू शकेल. इथे घरगड्यांच्या ह्या प्रश्नाची जबाबदारी बव्हंशी शासनानं स्वीकारलेली आहे. शासनाकडे घरगड्याला स्वतःचं नाव नोंदवावं लागतं. शासनानं ह्या घरगड्यांचे दर नेमून दिलेले आहेत. तेवढा कमीत कमी मोबदला त्यांची सेवा घेणाऱ्यांना द्यावाच लागतो. नोकरांसाठीही शासनाकडे संपर्क साधला तर नोकर त्वरित मिळू शकतो. त्याचा पूर्वेतिहास, त्यांच्या खाणाखुणा, वगैरे सारे तपशील उपलब्ध असतात.


मुंबईत घरगड्यांची एखादी नवीन संघटना उभी करताना आणखीही काही गोष्टींचा विचार करावा लागेल. मुंबईत घरगडी म्हणजे कोकणातले, विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यातले 'रामा' असं एक समीकरण ठरून गेलं आहे. परंतु हे आता बदलत आहे उत्तरेकडे आपण सरकू लागलो की घरगडी ( किंवा स्त्रिया ) हे झोपडपट्टयात न राहणाऱ्या भिन्न प्रांतीय समाजातूनही आलेले आढळतात. उप-नगरातून हे प्रमाण वाढत जाते. दक्षिण व मध्य मुंबईतल्या 'रामा' मध्ये व ह्या उत्त-रेतल्या घरगड्यांमध्ये अर्थातच फरक असतो. त्यांच्या मनोवृत्ती भिन्न असतात. वैचारिक दृष्टिकोन भिन्न असतात. कोकणातनं येणारा कदाचित समाधानी वृत्तीचा असेल तर अन्य घरगडी कदाचित जीवनावर चिडलेला, नैराश्यातनं भडकून उठ-लेला असेल. ह्या साऱ्या गोष्टींचा सांगोपांग विचार अशा संस्थेला करावा लागेल. तद्वतच, ह्या घरगड्यांमधला फार मोठा वर्ग अन्य नोकऱ्यांसाठी लायक ठरू शक-ण्याची शक्यता असते. केवळ योग्य मार्गदर्शन नाही, शिक्षण नाही म्हणून घर-गड्याच्या रूपात तो राबत असतो. ह्यांना मार्गदर्शन करणे, शैक्षणिक सुविधा उप-लब्ध करून देणे वगैरेही कामे, 'समाज कार्य' म्हणून ह्या संस्थेला पार पाडावी लागणार आहेत. ह्यानंतर उरतो तो असा वर्ग की ज्याची बौद्धिक, शारीरिक पातळीच कमी असते. अशा वर्गाला ह्या व्यवसायाखेरीज तरणोपायच नसतो. अशा वर्गाला काही हमी मिळवून देणे, किमान वेतन मिळवून देणे, त्याचे व त्याच्या दात्याचे संबंध सुरिहित ठेवणे ह्या जबाबदाऱ्याही अशा संस्थेला पार पाडाव्या लागतील. हे सारे श्री. डाह्याभाईंची सकल्पित संस्था आस्थापूर्वक करील का ? हा मुख्य प्रश्न आहे. घरगड्यांची संघटना बांधणं, त्याची नोंद करणं व ज्यांना घरगडी हवेत त्यांच्याकडे त्यांना पाठविणं एवढंच मर्यादित उद्दिष्ट जर संस्था समोर ठेवील तर ह्या संस्थेला एखाद्या सामान्य एम्प्लॉयमेंट ब्यूरोचं स्वरूप येईल. संघटनेमागच सामाजिक उद्दिष्ट नाहीसं होऊन, 'धंदेवाईक' 'ब्यूरोचं' स्वरूप येईल ! हे टाळून समाजोपयोगी संघटना उभी करायची असल्यास संघट-नेला वर उल्लेखिलेल्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील. पारही पाडाव्या लागतील. आणि त्यातच मुंबईतल्या घरगड्यांच्या प्रश्नाचं उत्तर सांपडेल ◻ ◻ ◻

## चित्रपट

# परिणामशून्य : सावन भादो

'सावन भादो' या चित्रपटाचे वैशिष्टय म्हणजे तो परिणामशून्य आहे. चित्रपटाची लांबी बेताची आहे व त्यातील घटना मोजक्या आहेत. त्यामुळे सर्वसाधारण हिंदी चित्रपटांप्रमाणे तो कंटाळवाणा, लांबलेलाही वाटत नाही. सुरुवातीला थोडा प्रणय, नंतर बराच वेळ रहस्य व चित्रपट संपतो. नायक–नायिकेच्या कामासाठी नवीन कलावंतांची जोडी आहे. पण त्यांचे सारे वागणे–बोलणे–चालणे इतके जुन्या छापाचे आहे की ती नविन्याची जराही वेगळेपण जाणवून देत नाहीत.

एका बड्या इस्टेटीचा वारसदार नवीन निश्चल परदेशातील शिक्षण आटोपून परत येतो, तेव्हा त्याचा काटा काढण्याची व अशा तऱ्हेने सारी इस्टेट लुबाडण्याची व्यवस्था त्याच्या सावत्र आईने–शामाने–केलेली असते. पण नवीन निश्चल परदेशातून मारामारीचे व्यवस्थित शिक्षण घेऊन आलेला असतो. त्यामुळे तिचे बेत फसतात. शेवटी ती नवीनच्या मोटारीतच टाइमबाँब ठेवून प्रवासात त्याचा स्फोट होईल अशी योजना आखते. ही योजना सफल झाल्यासारखी वाटते. नवीनवरील अंत्यसंस्कारही होतात. पण अचानक एक दिवस नवीन चेहऱ्यामोहऱ्याचा एक बदमाष



नवीन निश्चल व रेखा । अभिनयाचा छाप जुनाच

घरी येतो व शामासकट सर्व मंडळींना चकित करून सोडतो. हा खरोखरीचा बदमाष नसून, नवीनच्या चेहरेपट्टीशी पूर्ण साम्य असलेला पोलिस इन्स्पेक्टर असतो. शेवटी तो रहस्याचा भेद करतो. शामा डोंगरावरून उडी टाकून आत्महत्या करते. आणि तिच्या बाकी साथीदारांना अटक होते. इतके दिवस हॉस्पिटलात गुप्तपणे उपचार घेत पडलेला नवीन घरी येतो व त्याच्या खेडूत प्रेयसीशी त्याचे मीलन होते.

ही इस्टेट असते कोठे याचा पत्ता नाही. कारण शामा व तिची मुलगी पार्ट्या झोडतात तेव्हा तेथे तमाम शहरी संस्कृतीची मंडळी येतात व नवीन निश्चल प्रणय करण्यासाठी घराबाहेर पडतो तेव्हा त्याला डोंगर, त्यातून वाहणारी नदी, पाणी भरण्यास चाललेल्या ग्रामकन्या, त्यातलीच एक रेखा-असा फुललेला निसर्ग व भारतातील खेड्याचे वातावरण आढळते. अर्थात हा मुद्दा तसा महत्त्वाचा नाही. पण चित्रपटाचे बेगडी स्वरूप ध्यानात यायला एवढे उदाहरण पुरेसे आहे.

या चित्रपटातील रहस्य 'चेस ए क्रुकेड शॅडो' या गाजलेल्या इंग्रजी चित्रपटावरून घेतले आहे. पण त्याचा हा हिंदी नमुना इतका बेढब व नकली आहे की या चित्रपटावरून त्या जुन्या इंग्रजी चित्रपटाच्या पूर्वस्मृती जागृत करायच्या, तर त्या सुखद स्मृती विरळतील अशी भीती वाटते. आणि या दृष्टीने हा चित्रपट परिणामशून्य आहे तेच बरे आहे असे वाटते.

या चित्रपटातील सर्वात मोठे प्रसंग मारामारीचे आहेत आणि त्यातील वेगळेपण म्हणजे नेहमी हिंदी चित्रपटात गुद्यागुद्यांनी चालणारी मारामारी येथे पायांनी चालते. हिंदी नायक–खलनायक ज्या सफाईनं हाताचे गुद्दे लगावतात, त्याच सफाईने नवीन निश्चल – नायकाच्या किंवा पोलिस इन्स्पेक्टरच्या भूमिकेत–शत्रूला लाथांनी तुडवून काढतो.

आताच्या एकूण वर्णनावरून स्पष्ट झाली ती कामगिरी निर्माते–दिग्दर्शक मोहन सेगल यांची आहे. फिल्म इन्स्टिटयूटमध्ये शिक्षण घेऊन तयार झालेल्या नवीन निश्चलला, हिंदी हिरोच्या परंपरेप्रमाणे चित्रविचित्र अंगविक्षेप करायला लावून व गाणी गायला लावून त्याचा नवीनपणा घालवला आहे. रेखा दिसायला मोहक आहे. तिची दातांची ठेवण जरा जास्तच तोंडाच्या आत असल्याने विचित्र वाटते. तिचा नखरा किंवा अभिनय समजण्याइतका तिला या चित्रपटात वाव नाही. आहे ते काम तिने हिंदी नायिकांची भूमिका समजावून घेऊन केल्यासारखे वाटते. शामाचे पुनरागमन हे या चित्रपटाचे एक आकर्षण. सावत्र, कुटबाज आईच्या भूमिकेत तिने आपले कसब चांगले प्रकट केले आहे. ‘चेस ए क्रुकेड शॅडो’मध्ये चित्रपटाच्या, अत्युच्च रहस्याचा प्रसंग येतो तेव्हा नायिका सांगते की, ‘माझ्या घरात घुसलेला हा माझा भाऊ नक्कीच नाही कारण...कारण मीच त्याचा खून केलेला आहे.’

या प्रसंगाची त्या चित्रपटातील परिणामकारकता इतकी भयानक आहे की तो रहस्यभेद आपल्यालाही सहन होत नाही. ‘सावन भादो’मध्ये शामाही शेवटी अशाच आशयाचे काही वाक्य म्हणते. पण शून्य परिणामाने. कारण चित्रपटाच्या एकूण हाताळणीने रहस्यभेदातील गंमतच नाहीशी झाली आहे.

‘सावन भादो’ या नावाचा व चित्रपटाचा काय संबंध आहे हे कळले नाही.

सोनीक–ओमी यांचे संगीत मात्र मधुर आहे. ‘नजरबाज सैयां’ ही ठुमरी आणि ‘मेरा मन घबराये’ ही लोरी कानात काही काळ रेंगाळत राहातील अशी आहेत.

—मुंबईकर

---

## नवा उच्चांक

अनुबोधपट हे सर्वसाधारणपणे फुकट दाखवले जातात. म्हणजे प्रेक्षकाला त्यासाठी वेगळे पैसे द्यावे लागत नाहीत. थिएटर मालकाला मात्र काही नियमित भाडे द्यावे लागते. अनुबोधपटाच्या या विशिष्ट स्वरूपांमुळे त्यांना व्यापारी महत्त्व नसते. तथापि डॉक्टर मार्टिन ल्यूथर किंग या सुप्रसिद्ध निग्रो नेत्याच्या जीवनावर तयार करण्यात आलेल्या अनुबोधपटाला हे व्यापारी महत्त्व आले आहे. या अनुबोधपटाला केवळ अमेरिकेतच नव्हे तर अन्य देशातूनही भरपूर मागणी असून आत्तापर्यंत या चित्रपटाने ३,५०,००० डॉलर्सचे उत्पन्न मिळवले आहे. अनुबोधपटाच्या बाबतीत हा एक नवीन उच्चांक समजला जातो. निग्रो लोकांच्या कल्याणासाठी या चित्रपटाचे उत्पन्न वापरले जाईल.

—एस्

**पंडित वि. म. जोशी**
**ज्योतिष विशारद**

# अंदाज

१९ ते २५ सप्टेंबर १९७०

**मेष :** या आठवड्यात धनस्थितीत बरीच सुधारणा होईल. अपेक्षितरीत्या येणे असलेली रक्कम वेळेवर हातात पडेल. मंगळवार-बुधवार हा योग जास्त प्रबळ आहे. साहित्यिकांना थोडासा काळ त्रासदायक आहे. व्यापार-धंदा चांगला चालेल धार्मिक कामाकरिता प्रवास घडेल. मानमान्यता मिळेल. मित्रमंडळींकडून स्तुतिसुमने वाहिली जातील.

विद्याभ्यासात विद्यार्थ्यांना अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. संततीकडून त्रास होईल. भागीदार व गृहस्वामिनी संपूर्ण सहकार्य देतील. व्यापारात पत्नीच्या धोरणाने चालले अगर तिचे नांव भागिदारीत नोंदले तर जास्त फायदा होईल.

चंद्राचे भ्रमण २।३।४ या स्थानातून आहे ते फार चांगले आहे. घरात शुभ समारंभ गुरुवार-शुक्रवारी होईल. हे दिवस मित्रमंडळींसह आनंदात जातील. शनी लग्नी आहे तो हट्टीपणा वाढवील. त्याला जपावे. 'असो रागा । भीक मागा' अशी वेळ आणू नका. शुभ तारखा २२ ते २५.

**वृषभ :** या आठवड्यात धनस्थिती चांगली राहील. घराचे प्रश्न उपस्थित होऊन त्याकरता बराच खर्च करावा लागेल. संततीकडून द्रव्याची मदत चांगली होईल. सरकारी कामात अपयश येण्याची शक्यता आहे. षष्ठातील गुरु-शुक्र सर्व अडचणींतून पार पाडतील. सामाजिक दर्जाला कमीपणा खात्रीने येणार नाही.

घरात भावंडांकडून गृहकलह सुरू केला जाईल. शारीरिक पीडा होण्याचा संभव आहे. घरात वडील माणसे आजारी पडतील. मित्रांकडून चांगली मदत होईल. हलक्या धंद्यातून धनलाभ होईल.

चंद्राचे भ्रमण १।२।३ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. गुरुवार-शुक्रवार धार्मिक कामाकरता प्रवास घडेल. मंगळवार-बुधवार अचानक धनप्राप्ती होईल. शुभ तारखा २२ ते २५.

**मिथुन :** या आठवड्याच्या सुरुवातीला पैशाची जरा अडचण होईल. नंतर मंगळवार-बुधवार व्यापारात गुंतलेली रक्कम हातात पडेल. व्यापार-धंदा चांगला चालेल. ३६ च्या पुढे वय असलेल्या व्यक्तींना अचानक धनलाभाचा योग आहे. विद्याभ्यासात यशःप्राप्ती होईल.

सरकारी कामात यश येईल. प्रवास घडेल. धर्मकार्याकरता खर्च होईल. हातून काही तरी महत्त्वाचे सार्वजनिक कार्य होण्यात अडथळे निर्माण होण्याची दाट

शक्यता आहे. प्रकाशनाचा धंदा करणारांना भरपूर प्रसिद्धी व धनलाभ होईल. राजकीय कामात अपयश येईल.

चंद्राचे भ्रमण १२।१।२ या स्थानातून आहे, ते तितकेसे चांगले नाही. पहिले दोन दिवस मानसिक त्रास होईल. गृहस्वास्थ्य बिघडेल. शुभ तारखा २२ ते २५.

कर्क : या आठवड्यात धनस्थिती सुरवातीपासूनच चांगली राहील. मित्रमंडळी व भागीदार अत्यंत सहानुभूतीने वागतील. अनेक खर्च निर्माण होतील, त्याला सहज तोंड देता येईल.

मंगळवारी-बुधवारी घरात मंगल समारंभाकरता मित्रमंडळी व नातलग जमून दिवस आनंदात जाईल. हे दिवस लॉटरी तिकीट घेण्याला चांगले आहेत. घरातील वृद्ध माणसे आजारी पडली तरी गुरु-शुक्र याचा वाईट परिणाम होऊ देणार नाहीत.

चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या घरातून आहे. ते चांगलेच आहे. मित्रमंडळींकडे शुभ कार्याकरता जाण्याचा योग येईल व त्यात पुढाकार घ्यावा लागेल. भावंडांपासून सर्व बाजूंनी मदत होईल. शुभ तारखा २३ ते २५.

सिंह : या आठवड्यात धनस्थिती जरा तंग राहण्याची शक्यता आहे. हा अनुभव ३२ ते ३६ वयाच्या व्यापारी व्यक्तींना अनुभवाला येईल. २८ ते ३२ वयात काँट्रॅक्ट-मेडिकल-इंजिनीअरींग-प्रेस इत्यादी यंत्रप्रधान व्यवसायातील व्यक्तींचा भाग्योदय होण्याचा उत्तम योग आहे. भागीदार व पत्नीकडून संपूर्ण सहकार्य मिळेल.

संशोधनकार्यात गुंतलेल्या विद्यार्थ्यांना दिवस चांगले आहेत. त्यांना मानमान्यता प्राप्त होईल. पुष्कळशा रेंगाळलेल्या कामांना चालना मिळेल. परदेशी जाण्याचा योग येईल. त्यात यश प्राप्त होईल.

चंद्राचे भ्रमण १०।११।१२ या स्थानातून आहे. ते बरे आहे. व्यवहारात काही तरी अनपेक्षित विसरभोळेपणामुळे चूक होण्याचा संभव आहे. रविवारी सार्वजनिक कामात भाग घेतल्याने मोठेपणा मिळेल. शुभ तारखा २० ते २४.

कन्या : या आठवड्याची सुरुवातच धनयोगाला चांगली आहे. गुरु-शुक्र अचानक धनलाभ देतील. हा योग रविवार-सोमवार जोरदार आहे. प्रवासाचा बेत टाळावा. सरकारी कामात मोठ्या कष्टाने यशःप्राप्ती मिळेल. उद्योगधंद्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. बौद्धिक व्यवसाय करणारांना आठवडा तितकासा ठीक नाही.

विद्यार्थ्यांना हा सप्ताह अनेक अडचणी उत्पन्न करणारा आहे. शास्त्र अगर संशोधन करणाऱ्यांना त्रासदायक जाईल. संततीची प्रत्यक्षात प्रगती तितकीशी होणार नाही. शत्रूंचा नाश निश्चित होईल. ४२ वयाचे पुढे असलेल्या व्यक्तींना हा अनुभव येईल.

चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानातून आहे ते चांगले आहे. मित्रमंडळींकडून व वडील भाऊंडांकडून सर्व तऱ्हेची मदत केली जाईल. मंगळवार-बुधवार मान-सन्मान आणि पैसा दोन्ही भरपूर मिळण्याचा शुभ योग आहे. सर्व आठवडाच प्रगतीपर व शुभ आहे.

तूळ : सप्ताहाच्या सुरुवातीलाच सामाजिक कार्याला व धनलाभाला पहिले दोन दिवस अनिष्ट आहेत. शक्य तितकी आर्थिक कामे पुढे ढकलावी. ता. २२।२३ ला आपोआप धनलाभ घडून येईल. स्वभावात अत्यंत आग्रहीपणा येईल. त्याला शक्य तितका आवर घालावा. नोकरीचा प्रयत्न ता. २४ ला करावा.

विद्याभ्यासात यश:प्राप्ती कष्टानेच होईल. एकच शुभ योग म्हणजे गुरु-शुक्र लग्नी आहेत. व्यवहारात अगदी विरुद्ध असलेल्या व्यक्तीकडून २२।२३ तारखांना अनपेक्षित मदत होईल. एकाद्या मोठ्या वाहतुकीच्या धंद्याची एजन्सी मिळण्याची शक्यता आहे. २४ ते २७ वयातील व्यक्तींना हा योग प्रबल आहे.

चंद्राचे भ्रमण ८।९।१० या घरातून आहे. ते मिश्र फल देणारे आहे. रविवार-सोमवार कोणतेही काम नीट होणार नाही. मनस्ताप फार होईल. प्रतिष्ठेला धक्का बसतो की काय असे होईल. पण तसे काहीही घडणार नाही. मंगळवार-बुधवार पैशाची कामे होतील. व गुरुवार-शुक्रवार उद्योग-धंद्याकरता अगर नोकरी करता केलेले प्रयत्न सफल होतील, शुभ तारखा २२ ते २५.

वृश्चिक : सप्ताहाच्या सुरुवातीपासूनच आर्थिक व्यवहार जपून करावे. अगदी खास जिवाचे मित्र, भागिदार कोणीही मदतीला येणार नाहीत. त्यामुळे पत जाण्याची वेळ येईल. घरासंबंधीचे व्यवहार बिघडतील. पण ता. २२ नंतर या परिस्थितीत फरक पडेल व संकटातून सुटका निश्चित होईल.

साहित्यिक, लेखक, कलाकार यांना हा सप्ताह प्रगतीपर आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासात आर्थिक अडथळे निर्माण करणारा सप्ताह आहे. शास्त्रांचा अभ्यास करणारांना दिवस चांगले आहेत. अचानक धनलाभाचा योग आहे. लॉटरीचे तिकिट विकत घेण्याला मंगळवार चांगला आहे.

चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानातून आहे ते शुभ आहे. सरकारी कामात संपूर्ण यश देणारा आठवडा आहे. मंगळवार-बुधवार प्रवासाचा योग आहे. त्यात फायदा होईल. मात्र चंद्र अष्टमात असल्यामुळे प्रवासात विसरभोळेपणाने वस्तू हरवण्याचा संभव आहे. काळजी घ्यावी. २५ तारखेला कोणतेही काम यशस्वी रीतीने हाताळता येईल. शुभ तारखा २२ ते २५.

धन : सप्ताहाच्या आरंभापासूनच शांतपणाची कसोटी लागणार आहे. ता. १९ ला शनिवारी मित्रमंडळींकडून आर्थिक बाबतीत मागणी होईल. त्याकरता मानसिक यातना होतील. स्त्री-मित्रांकडून विशेष त्रास होईल. राहण्याचा जागे-बद्दल अगर नवीन घराचे खरेदीबद्दलचे प्रश्न मंगळवार-बुधवारी तडीला लागतील.

विद्याभ्यासात यश:प्राप्ती होणे लांबणीवर पडेल. कलाकारांना दिवस चांगले

आहेत. सरकारी कामात मानमान्यता मिळण्याचा चांगलाच संभव आहे. विवाहाची खटपट मंगळवार-बुधवारी केल्यास शुभ घटना घडण्याचा पुष्कळसा संभव आहे.

चंद्राचे भ्रमण ६।७।८ या स्थानातून आहे ते तितकेसे चांगले नाही. चंद्राला सहा-आठ घरांचा दोष नसतो. ता. १९ ला मुलांच्या भांडणावरून मनस्ताप होईल. मंगळवार-बुधवार सर्व कामात यश देणारे आहेत. शुभ तारखा २२ ते २५.

मकर : या आठवड्यात धनस्थितीत सुधारणा होईल. मागील येणे विनायास वसूल होईल. घरात शनिवारी सासूरवाडीकडील माणसे समारंभाकरता जमतील. दिवस मजेत जाईल. धंदा-व्यवसाय चांगलाच चालेल.

विद्यार्थ्यांना व बौद्धिक व्यवसाय करणारांना दिवस चांगले आहेत. संततीचा भाग्योदय होण्याची वेळ आली आहे. मिलीटरी अगर मेडिकल खात्यातील अधिकाऱ्यांना अचानक धनलाभ होईल. सरकारी नोकरांना बढती मिळेल.

चंद्राचे भ्रमण ता. ५।६।७ या स्थानातून आहे ते चांगले आहे. ता. २२।२३ ला भागीदारीत आर्थिक फायदा भरपूर होण्याचा योग आहे. या दिवशी लॉटरीचे तिकिट घेतले तर धनलाभ होण्याचा जोरदार योग आहे. शुभ तारखा २१ ते २५.

कुंभ : दिवस आर्थिक सुधारणा व गृहसौख्य वाढविण्यास अनुकूल होत आहेत. भाग्यातले गुरु-शुक्र प्रत्येक गोष्ट मनाप्रमाणे घडवून आणतील. जागा, जमीन अगर घरासंबंधी प्रश्न मित्रांच्या मदतीने सहजरीतीने मनासारखे सुटतील. बुध-रवीचा अन्योन्य योग घरात पत्नीशी व मुलांशी मतभेद निर्माण करील.

विद्याभ्यासात यश येईल. साहित्यिक, लेखक, वृत्तपत्र व्यावसायिकांना दिवस यशदायी आहेत. नवीन मासिके सुरू होण्याला चांगले दिवस आहेत. डॉक्टर लोकांच्या हातून महत्त्वाच्या अवघड केसेस सुखरूप सोडवल्या जातील. भावंडांशी भांडणे होतील. प्रवास घडण्याचा योग आहे. त्यात त्रास होईल.

चंद्राचे भ्रमण ४।५।६ स्थानातून आहे ते फारच चांगले आहे. शनिवारखेरीज सर्व सप्ताह शुभफलदायी आहे. शनिवारी जपून रहावे.

मीन : अचानक खर्च निर्माण होतील. गुरू-बुध केंद्राधिपती अशुभ स्थानात आहेत. सुखहानी होण्याची भिती आहे. रागामुळे नुकसान होईल. शब्द पाळता पाळता जाव कंटाळून जाईल. भाग्येश धनेश मंगळ अशुभ स्थानात शत्रू बरोबर आहे. उद्योग-धंद्यात अनेक अडचणी निर्माण होतील. ही devalued गटाची राशी आहे.

विद्यार्थ्यांना, लेखकांना, साहित्य-प्रकाशकांना दिवस त्रासदायक आहेत. मित्र मदतीला धावून येतील. एकच शुभ योग आहे अष्टमातील गुरू-शुक्र युती धननाश होऊ देणार नाही. उलट अचानक धनलाभ धंद्यातून होईल. शत्रूचा पराभव निश्चित होईल. लॉटरीत धनप्राप्ती संभवते.

चंद्राचे भ्रमण ३।४।५ स्थानातून आहे ते चांगलेच आहे. रविवार-सोमवारी मुलांकडून शुभ समाचार कळेल. बाहेर गावाहून मुले घरी येण्याचा योग आहे. मंगळवार-बुधवार घरात आवडती मंडळी जमतील व काळ आनंदात जाईल. संततीचा उत्कर्ष होईल. शनिवार खेरीज सप्ताह शुभफलदायी आहे. □ □ □

रूपवती भार्या शत्रुः
आणि
तो मी नव्हेच !
या दोन लेखमालांनंतर
ॲडव्होकेट माधव कानिटकर
यांची
नवी लेखमाला

१९५७
पंजाब नॅशनल बँक
धाडसी दरोडा....

माणूस
शनिवार
दिनांक २६ सप्टेंबर १९७० अंकापासून....

ही लेखमाला
बुधवार आणि शनिवार
क्रमशः प्रसिद्ध होईल.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649

# अग्निपुत्र

वसन्त पोतदार

प्रसिद्धीकाल : १९७० अखेर

प्रसिद्धीकाल : १९७१ मध्य

रा. म. शास्त्री

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

राजहंस प्रकाशन